# अर्थबोधपत्रिका

**अंक १०** **जुलै २०००**

महत्त्वाच्या आर्थिक, राजकीय, व सामाजिक
विषयांवरील माहिती सर्वांपर्यंत पोचवणारे माध्यम

---

**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी**

(केवळ खाजगी वितरणासाठी)

## अर्थबोधपत्रिकेविषयी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेतर्फे "अर्थबोधपत्रिका" हे आर्थिक, सामाजिक, व राजकीय विषयांवरील माहितीपूर्ण लेख देणारे प्रकाशन, नोव्हेंबर १९९८ पासून प्रकाशित करण्यात येत आहे. सर्वसामान्य मराठी वाचकांना विविध विषयांवर अभ्यासपूर्ण माहिती देणे, एखाद्या विषयाच्या सर्व बाजू निष्पक्षपणे मांडणे, तसेच विविध समस्यांच्या संदर्भातील सैद्धांतिक व संकल्पनात्मक बाबी सोप्या शब्दांत देणे, हे या पत्रिकेचे उद्देश आहेत. विशेषतः अनेक विषयांवरील सखोल माहिती व सैद्धांतिक बैठक असणारे विश्लेषणात्मक लेख छापणारी जी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरची इंग्रजी भाषेतील नियतकालिके व पुस्तके आहेत, व ज्यांतील माहिती एरवी मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी माहिती मराठी वाचकांपर्यंत पोचविण्याचा आमचा प्रयत्न आहे.

जानेवारी २००० पासून अर्थबोधपत्रिकेचे दुसरे वर्ष सुरू झाले असून दुसऱ्या वर्षाचा हा चौथा अंक आहे. सलग क्रमांकानुसार हा दहावा अंक आहे.

पुढील सहा अंक मिळविण्यासाठी देणगीमूल्य रूपये ५०/- (रु. पन्नास फक्त) डिमांड ड्राफ्टने / मनीऑर्डरने / पोस्टल ऑर्डरने / रोख पाठवावे. त्याबरोबर नाव व पूर्ण पत्ता पाठवावा. यासंबंधीचा अर्ज अंकात शेवटच्या पानावर देण्यात आला आहे.

**अर्थबोधपत्रिका : अंक १० : जुलै २०००**

**संपादक** : रमेश पानसे - **संपादन सहाय्यक** - राज्यश्री क्षीरसागर

**प्रकाशक** : भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी, 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११ ०१६.

**मुद्रक** : एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११ ०३०.

**पत्रव्यवहारासाठी पत्ता** : संपादक, अर्थबोधपत्रिका, 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे ४११ ०१६.

# अर्थबोधपत्रिका

**अंक १०** **जुलै २०००**

महत्त्वाच्या आर्थिक, राजकीय, व सामाजिक
विषयांवरील माहिती सर्वांपर्यंत पोचवणारे माध्यम

---

**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी**
'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे ४११ ०१६.
फोन : ५६५७१३२ / ५६५७२१०

(केवळ खाजगी वितरणासाठी)

# अवकाशातील विमानापरी, आगगाडी ही खरी !

*विमानाचा प्रवास हा एकविसाव्या शतकातील एक अत्यावश्यक घटक असेल, किंबहुना तो आताही तसा फारच महत्त्वाचा झाला आहे. वेळेची बचत करून जास्तीत जास्त काम करण्यासाठी विमान प्रवास हा मोलाचा ठरतो. कित्येक दिवसांचे अंतर काही तासांवर आणणारा विमानाचा प्रवास हा आर्थिक प्रगतीसाठी वरदान ठरला आहे. पण आता हीच वेळेची बचत करण्यापेक्षा आपला जीव बचावणे महत्त्वाचे ठरणार आहे.*

*लंडनमधील 'फ्रेंड्स ऑफ अर्थ' या पर्यावरणविषयक काम करणाऱ्या संस्थेने नुकत्याच केलेल्या अभ्यासाद्वारे असा निष्कर्ष काढला आहे की विमानामुळे अतिशय मोठ्या प्रमाणात प्रदूषण होते. रस्त्यांवरील मोटारींच्या इंधनातून बाहेर पडणाऱ्या कार्बन-डायऑक्साईडमुळे होणाऱ्या प्रदूषणाच्या तुलनेत विमानातील इंधनामुळे होणारे प्रदूषण खूपच जास्त आहे. ब्रिटनमधील एका नागरिकाच्या वर्षभराच्या मोटार वापरण्याने (सरासरीप्रमाणे) जे प्रदूषण होते, त्यापेक्षा जास्त प्रदूषण, ब्रिटनमधील लंडन ते अमेरिकेतील मायामी एवढ्या अंतरासाठीच्या एका विमानफेरीतच होते असे त्यांना आढळले आहे.*

*पृथ्वीवरील तापमान सतत वाढत असून वातावरणातील या बदलासाठी कार्बन-डायऑक्साईडचे वाढते प्रमाण कारणीभूत आहे, हे यापूर्वीच सिद्ध झाले आहे. पृथ्वीचे, मानवी व मानवेतर जिवांचे अस्तित्व टिकण्यासाठी निसर्गाचा समतोल राखणे अत्यावश्यक आहे. पण विमानांचा वापर जितका वाढेल तितकेच हवेतील कार्बन-डायऑक्साईडचे प्रमाण वाढेल आणि जग विनाशाकडे वाटचाल करेल, त्यामुळे विमानातून प्रवास करणे टाळावे असे आवाहन या संस्थेने केले आहे. 'वेळ वाचविण्याआधी आपला जीव वाचवा' असे त्यांचे सांगणे आहे. नागरिकांनी उगीचच लांबचे प्रवास करू नयेत, आपल्या घराजवळच किंवा शहराजवळच आगगाडीतून कमी अंतराचे प्रवास करून छोट्या सहलींमधून आनंद मिळवावा अशी त्यांची विनंती आहे.*

*जमिनीवरील वाहतूकदारांना इंधनावरील कर द्यावा लागतो, पण विमान वाहतूकदारांना असे बंधन नाही, त्यामुळे ते इंधन वाचवीत नाहीत, याकडेही त्यांनी लक्ष वेधले आहे. प्रदूषणाच्या व पर्यावरणाच्या दृष्टिकोणातून आता 'अवकाशातील विमानापरी आगगाडी ही खरी' असे म्हणण्याची वेळ आली आहे.*

*(संदर्भ - 'डाऊन टू अर्थ' - ३१ मे २०००)*

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| | संपादकीय | ५ |
| १. | शिक्षण आणि जीवघेणी स्पर्धा ( जपान ) | ६ |
| २. | सर्जनशीलतेचे बाळकडू आणि शिक्षण ( जागतिक ) | १२ |
| ३. | आर्थिक विषमतेतून संघर्ष वाढणार ? ( अर्जेंटिना ) | १८ |
| ४. | आर्थिक समानतेसाठी राष्ट्रसंघ प्रयत्नशील ( आंतरराष्ट्रीय ) | २० |
| ५. | समानतेच्या तत्त्वाचा विजय ( फ्रान्स ) | २२ |
| ६. | एक लोकशाही राष्ट्र ? ( भारत ) | २४ |
| ७. | 'तारेवरची कसरत' सर्वत्र सारखीच ! ( अमेरिका ) | २८ |
| ८. | जागतिकीकरण आणि स्थानिकता ( जागतिक ) | ३० |


---

**सूचना**

- अर्थबोधपत्रिकेच्या सहा अंकांचे देणगीमूल्य रूपये ५०/- (रु. पन्नास फक्त) डिमांड ड्राफ्टने / मनीऑर्डरने / पोस्टल ऑर्डरने / रोख पाठवावे. त्याबरोबर नाव व पूर्ण पत्ता पाठवावा. यासंबंधीचा अर्ज अंकाच्या शेवटी दिलेला आहे. कोणत्याही अंकापासून सभासद होता येते.
- या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत अशी आपणास विनंती आहे.
- अंकातील मजकूर आपण आपल्या नियतकालिकात / वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. फक्त लेख प्रसिद्ध केल्यावर 'अर्थबोधपत्रिका - भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी च्या सौजन्याने' अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे.
- लेख प्रसिद्ध झाल्यावर संस्थेतर्फे कोणतेही मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला पाठवावा ही अपेक्षा आहे.

# भूतदया की व्यापारी बंदी ?

*अमेरिकेतील तीन मोठ्या सुपर मार्केट्सनी भारतातून आयात करण्यात येणाऱ्या चामडीवस्तूंवर (लेदर प्रॉडक्ट्स) बंदी घातली आहे. चामडे मिळविण्यासाठी भारतातील जनावरांना अतिशय क्रूरपणे ठार करण्यात येते असे म्हणून 'पीपल फॉर इथिकल ट्रीटमेंट ऑफ अँनिमल्स' (पी. इ. टी. ए.) या अमेरिकेतील स्वयंसेवी संस्थेने मोठ्या दुकानांसमोर मोठ्या प्रमाणावर निदर्शने केली. त्यानंतर 'गॅप', 'ओल्ड नेव्ही', आणि 'बनाना रिपब्लिक' या दुकानांनी भारतातील चामडीवस्तूंवर बंदी घालण्याचा निर्णय घेतला.*

*परदेशात चामडी वस्तूंना जास्त मागणी असल्याने भारतात गाई, म्हशी आदि जनावरांना प्रथम पाळण्याचा व नंतर त्यांना क्रूरपणे ठार करण्याचा अनैतिक उद्योग फोफावला, असे वरील संस्थेच्या कार्यकर्त्यांनी सांगितले. बहुतांश राज्यांमध्ये दुभत्या गाई व बछड्यांना ठार करण्यास बंदी आहे. पण चामडे मिळविण्यासाठी अशा जनावरांना रात्रीच्या अंधारात ट्रक्समध्ये कोंबून खाटकाकडे नेण्यात येते आणि अतिशय हालहाल करून त्यांना ठार करून त्यांचे कातडे कमावण्यात येते. अनेक ठिकाणी चांगले कातडे मिळावे यासाठी जिवंत गाईंवर उकळते पाणी टाकण्यात येते, यामुळे त्यांचे कातडे लालसर, गुलाबी होते आणि वस्तू तयार करताना त्याची गुणवत्ता वाढते, असे सांगण्यात आले. भारतीय समाजातून या बंदीचे स्वागतच करण्यात आले आहे, तरीही केरळ, पश्चिम-बंगाल येथे असा अनैतिक उद्योग असल्याचे काही स्थानिक संघटनांनी म्हटले आहे.*

*भारतातील चामडे उद्योजक मात्र हा आरोप मान्य करीत नाहीत. भारतातील चामड्याच्या वस्तूंची अमेरिकेतील बाजारपेठ वाढत असून अमेरिकेतील अर्थव्यवस्थेला ते परवडणारे नाही, म्हणून क्रूरतेच्या बनावाखाली भारतीय वस्तूंचा खप कमी करण्याचा, व्यापारी बंदी घालण्याचा हा 'डाव' आहे असे भारतीय चामडे उत्पादक संघाचे अध्यक्ष मोतीलाल सेठी यांनी स्पष्ट केले आहे. नाहीतरी खाण्यासाठी म्हणून हजारो गुरे मारणाऱ्या अमेरिकेने पशूंविषयी असा कळवळा दाखवणे हे अघटितच !*

*जनावरांचे कातडे नैसर्गिक रीतीने उपलब्ध व्हावे, त्यांना क्रूरपणे ठार करू नये यासाठी चामडे उत्पादक प्रयत्नशील आहेतच. पण अमेरिकेतील स्वयंसेवी संस्थांना फक्त भारतीय जनावरांचाच कळवळा का ? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे.*

*(संदर्भ - 'डाऊन टू अर्थ' - ३१ मे २०००)*

# संपादकीय

अर्थबोधपत्रिकेचा हा 'दहावा' अंक. विषयांची विविधता वाढविण्याचे आमचे प्रयत्न या अंकात वाचकांना प्रत्ययाला येतील. शिक्षणाविषयीची, एका अर्थाने प्रातिनिधिक म्हणता येईल अशी, गंभीर परिस्थिती सांगणारा लेख हा जपानमधील शिक्षणाविषयीचा आहे. तर या परिस्थितीवर मात करणारी अशी शिक्षणाची दिशा कोणती असेल असे सांगणारा 'सर्जनशीलतेचे बाळकडू' हा लेख, सार्वत्रिकरित्या सर्वच देशांना लागू पडणारा असा आहे. असाच सार्वत्रिकरित्या विचारात घ्यावा असा विषय 'समानते'चा आहे. फ्रान्सच्या राज्यक्रांतीला दोनशे वर्षे होऊन गेली; परंतु, समानतेच्या व्यवहारापासून जग अजून अनेक कोस दूरच आहे. देशादेशांची अंतर्गत परिस्थिती वेगवेगळी आहे; तेथील विषमतेची कारणेही वेगवेगळी असतील; परंतु, जग समानतेच्या आदर्शवत् स्थितीऐवजी विषमतेच्या दिशेने झुकते आहे असा संशय व्यक्त करायला जागा आहे. अर्जेंटिना या लॅटिन अमेरिकन देशाच्या संदर्भातील लेख किंवा संयुक्त राष्ट्रसंघाच्या संदर्भातील लेख या संशयाला पुष्टी देणारे असेच आहेत. स्वातंत्र्य, समता, बंधुता ही आधुनिक जगाची तत्त्वत्रिसूत्री देणाऱ्या खुद्द फ्रान्समध्येच, स्त्री-पुरुष समतेच्या संदर्भातील राजकीय परिस्थिती सांगणारा छोटा लेख पुन्हा समतेच्या बाबतीतील परिस्थितीवर प्रकाश टाकत आहे. भारतातील कायदेमंडळांत स्त्रियांच्या आरक्षणाचा जो प्रश्न आज ऐरणीवर आहे. त्याला काही प्रमाणात सहाय्य करणारे विवेचन फ्रान्सवरील लेखात आढळते. हीच पार्श्वभूमी घेऊन, भारतातील लोकशाही विषयी 'अर्थविज्ञानवर्धिनी'मध्ये झालेल्या चर्चेवर आधारित लेखही या अंकात देण्यात आला आहे.

वाचकांनीच, ही विषयाची विविधता इतर संबंधितांसमोर जरूर आणावी, आणि अर्थबोधपत्रिकेच्या वर्गणीदारांची संख्या वाढवावी, असे आवाहन आम्ही करीत आहोत. वाचकांनी या पत्रिकेबाबत इतरांशी बोलत राहायला हवे. तरच पत्रिकेचा, इतरांना महत्त्वाची माहिती पुरविण्याचा हेतू साध्य होऊ शकेल.

■■

# शिक्षण आणि जीवघेणी स्पर्धा

विकासाच्या क्षेत्रात पुढारीपण करू पाहणाऱ्या जपानमध्ये, स्पर्धात्मकतेचे वातावरण अगदी एका टोकाला पोचले आहे. ही स्पर्धा शिक्षणक्षेत्रात मध्यवर्ती स्थानी येऊन आता तेथील शिक्षण मुलांना अकाली प्रौढ बनवू लागले आहे; आणि कुटुंबव्यवस्था विलक्षण आत्मकेंद्री आणि त्यातून क्वचित् हिंसक बनत चालली आहे. अलीकडेच 'द इकॉनॉमिस्ट' व 'एशियावीक' या मासिकांत प्रसिद्ध झालेल्या बातमीवजा लेखांमधून जपानचे हे चित्र समोर येत आहे.

जपान हे राष्ट्र आंतरराष्ट्रीय पातळीवर उद्योग-व्यापार क्षेत्रात उच्च स्थान प्राप्त करण्याच्या विचाराने झपाटले आहे. टेलिकॉम व इंटरनेट उद्योग फोफावताहेत. आणि नवनव्या संधींसाठी तरुणांना तयार करण्यासाठी नवनवीन कल्पनाही लढविल्या जात आहेत. तरुणांची निवड करून त्यांतून उद्योजक घडविण्याचाही घाट घातला जात आहे. आता पालक आपल्या चार ते सात वर्षांच्या मुलांना टोकियोमधील 'सन् किडस्' मध्ये घालू शकतात. येथे केवळ स्पर्धात्मक जगासाठी बालकांना घडवले जाते. येथे 'सर्वांसारखे असावे' हा धडा न देता 'व्यक्तिकेंद्री' असावे असाच सल्ला दिला जातो. मुलांना लहान वयापासूनच खरेदी-विक्रीची कौशल्ये पुरविली जातात. भावी उद्योजक निर्माण करणारी ही शाळा लोकांना आवडू लागली आहे असे शाळाचालकांचे म्हणणे आहे. चांगली विद्यापीठे चांगल्या माध्यमिक शाळांतून विद्यार्थी निवडून घेतात, तर चांगल्या माध्यमिक शाळा चांगल्या प्राथमिक शाळांतील निवडक विद्यार्थ्यांना प्रवेश देतात. आता हे 'निवडी'चे लोण खालीही उतरले आहे. दर्जेदार प्राथमिक शाळांत प्रवेश घेण्यासाठी आपल्या पाल्यांना, पालक, दर्जेदार बालवाड्यांत घालू पाहतात आणि त्यासाठी त्यांना बालवाडी प्रवेशवर्गांना मोठाले शैक्षणिक शुल्क भरावे लागत आहे.

या सर्वच पातळीवरच्या प्रवेशपरीक्षा हीच एक जपानमधील कुटुंबांची डोकेदुखी होऊन बसली आहे. बहुतेक गृहिणींचे संपूर्ण विश्वच त्यांच्या मुलांच्या

शिक्षणामध्ये समावलेले आहे. इतके की त्यांना 'क्योइक् मम्मा' म्हणजे 'शिक्षणमाता' असेच चेष्टेने संबोधले जाते. आपल्या मुलांचे शिक्षण याशिवाय त्यांना दुसरा विषय नसतो.

टोकियो किंवा असेच कोणतेही जपानमधील शहर घ्या. तेथे रात्री नऊच्या सुमारास अनेक तरूण आया ठराविक इमारतींच्या बाहेर गर्दी करून उभ्या आहेत. 'जुकू'मधून बाहेर येणाऱ्या आपल्या आठ-दहा वर्षांच्या मुलांची त्या वाट बघत आहेत. ही मुले या जुकूंमध्ये म्हणजे खाजगी शिकवणी वर्गांमध्ये म्हणजे क्लासेसमध्ये, शाळांच्या प्रवेशपरीक्षांच्या तयारीसाठी आपल्या दिवसभरच्या शाळांतून सुटल्यावर जात असतात. कारण पुढल्या वर्षी त्यांना कुठल्यातरी उत्तम शाळेत प्रवेश मिळवायचा असतो. आणि हा प्रवेशपरीक्षांचा ज्वर अगदी बालवाड्यांतूनही पसरलेला आहे. मुलांना असे खाजगी क्लासेसमध्ये तर अडकवले जातेच; पण घरीही आया मुलांना संभाषणाचे, शिस्तीचे, वागण्याच्या पद्धतींचे नि पद्धतशीर कसे खेळावे याचेही शिक्षण सतत देतच असतात. मुलांना अगदी स्वयंपाकातसुद्धा मदतीसाठी ह्या आया आपल्याबरोबर घेतात ते मुलांना अशी कामे करायला आवडते म्हणून नव्हे, तर प्रवेशावेळच्या मुलाखतीत त्यांनी इतरांपेक्षा वेगळे असे उठून दिसावे म्हणून ! मॅकिझावा शिझो हे एक जपानमधील मानसोपचारतज्ज्ञ. या शिक्षणमातांचं त्यांनी केलेलं वर्णन महत्त्वाचं आहे. ते म्हणतात, "या आयांची अशी ठाम समजूत आहे की खाजगी प्राथमिक शाळेत मुलाला प्रवेश मिळणे म्हणजे, त्यांच्या, त्यांच्या मुलांच्या आणि एकूण कुटुंबाच्या सुखाची हमीच आहे."

आयांनी आपलं सर्व लक्ष असं मुलांना चांगल्या शाळेत प्रवेश मिळण्यावर केंद्रित केलं, आणि समजा दिवस-रात्र झटूनही हव्या त्या शाळेत प्रवेश मिळाला नाही तर ? हा पराभव कसा पेलणार? खरं म्हणजे, सगळ्याच मुलांना हवा तिथे प्रवेश मिळणार कसा ? काहींना तरी निराश व्हावंच लागणार ! मुले ही मुलेच असतात. त्यांना अशा यशापयशाची फारशी क्षिती नसते. पण आयांच्याच भावना या बाबतीत अतिशय तीव्र असतात. लहानग्या मुलांना हव्या त्या शाळेतील प्रवेश नाकारला जाणे हा मुलाच्या आईला स्वतःचाच पराभव वाटतो. मन खचून जाते.

असंच अलीकडे घडलं. यामाडा मित्सुको या टोकियोमधील पस्तीशीच्या गृहिणी. त्यांची आणि त्यांच्या शेजारणीची मुलगी या दोघीही दोन वर्षे वयाच्या मुली. त्यांना चांगल्या बालवाडीत प्रवेश मिळावा म्हणून दोघींच्याही आयांनी आपापल्या मुलींची, प्रवेश परीक्षांची, अर्थातच, दिवस-रात्र तयारी करून घेतली. झालं ते

एवढंच की शेजारणीच्या मुलीला प्रवेश मिळाला. पण यामाडाच्या मुलीला मात्र नाही. यामाडाबाईंना हे सहन झाले नाही. त्यांनी शेजारणीच्या मुलीला, गळा घोटून मारून टाकले; तिचे शव एका बॅगेत घालून, आपल्या आईबापांच्या, टोकियोपासून पंचाहत्तर किलोमीटर्सवर असलेल्या घरी नेऊन, बागेत पुरून टाकले. पुढे हा गुन्हा उघडकीला आला तेव्हा वृत्तपत्रांनी त्याचे वर्णन 'प्रवेशपरीक्षा हत्या' असे केले.

ही गोष्ट इथे संपत नाही. अनेक मासिके, वृत्तपत्रे यांनी यावर अग्रलेखही लिहिले. त्यांत दोन गोष्टींवर भर दिलेला दिसून आला. एक म्हणजे, शिक्षणातील अतिरेक आणि दुसरी गोष्ट म्हणजे या रिकाम्या गृहिणी. या गृहिणींना आपल्या मुलांच्या अतिरेकी नि विकृत अशा स्पर्धाज्वराने पछाडलेले असते; त्यातच त्यांना जीवनाचे सार्थक वाटत असते. जपानमधील निप्पॉन टेलिव्हिजनने यासंदर्भात लोकांकडून प्रतिक्रिया मागवल्या; तेव्हा, एका दिवसातच ३००० पेक्षा जास्त प्रतिक्रिया फॅक्सने जमा झाल्या. यांमध्ये यामाडाबाईंना सहानुभूती दर्शविणाऱ्या प्रतिक्रिया काही थोड्या नव्हत्या. एका ११ वर्षाच्या मुलाच्या आईने तर स्पष्टच लिहिले आहे की, "यामाडाला काय वाटले असेल ते मला चांगले कळू शकते; कारण प्रामाणिकपणे सांगते की, मलाही एकदा असेच वाटले होते."

या नोकरी-व्यवसाय न करणाऱ्या म्हणजे रिकाम्या असणाऱ्या गृहिणी आणि त्यांचे 'शिक्षणमातां'मध्ये होणारे रूपांतर हाच आता, यामाडाच्या गुन्ह्याच्या संदर्भातील चर्चेत आलेला, एक महत्त्वाचा मुद्दा आहे. त्याला विषमतेचे एक सामाजिक अंग आहे, आणि हेच वास्तव, म्हटले तर, केवळ जपानमध्येच नव्हे तर सर्वच ठिकाणी, अगदी भारतातील मोठ्या शहरांतून आढळून येत आहे.

जपानमधील बरेचसे पुरूष जवळजवळ घरांत नसतातच, इतके ते आपल्या उद्योगांत मग्न असतात. मुलांच्या वाढीची आणि शिक्षणाची जबाबदारी, त्यामुळे, पूर्णतः आयांचीच असते. अशा आयांपैकी श्रीमंत आयांचा एक वर्ग आहे. हा वर्ग, दरमहा अगदी चाळीस हजार रूपये फी देऊनही, प्रवेशपरीक्षांच्या तयारीसाठी, आपल्या मुलांना खाजगी क्लासेसमध्ये अडकवतो. याचाच एक 'प्रदर्शन परिणाम' आता दिसून येतोय. मध्यमवर्गीय त्यांचे अनुकरण करू पाहताहेत. आपल्या उत्पन्नातील मोठा वाटा या शिकवण्यांसाठी द्यायला हा वर्ग उद्युक्त होतोय. स्पर्धेत टिकाव धरण्यासाठी मुलांना उत्तम शाळांतून घातलेच पाहिजे, असा ध्यास या गटातील भगिनीही घेऊ लागल्या आहेत. उच्च-नीच भावांचा एक 'वर्गसंघर्ष' आता तिथे उभा राहू लागला आहे. "श्रीमंत आणि मर्सिडिस-बेंझ

गाडीतून आपल्या मुलाला बालवाडीच्या पूर्वतयारीवर्गात घेऊन येणारी आई दुसऱ्या, केवळ देशी गाडीतून मुलाला तिथे पोचावयाला येणाऱ्या आईकडे तुच्छतेने पाहते." असे मानसोपचारतज्ज्ञ मॅकिझावा यांनी म्हटले आहे. त्यांच्याकडे, अलीकडे, अशा प्रकारच्या तुच्छतेला बळी पडून मानहानी झालेल्या महिला, मनावर परिणाम होऊन, रुग्ण म्हणून येऊ लागल्या आहेत. ज्या यामाडासारख्या महिलांची पार्श्वभूमी ग्रामीण आहे त्यांच्याबाबतीत शहरी उच्चवर्गीय महिलांची पाहण्याची दृष्टीच अशी असते की त्यांना सदैव दबल्यासारखे वाटते, आपण फार कमी आहोत, असे वाटते. येथे आता एक वेगळीच संस्कृती उभी राहिली आहे. जिथे नवऱ्यांचे पगार-बढत्या, आणि मुलांच्या शाळा यांवरच कुटुंबाचे सामाजिक प्रतिष्ठेचे मोजमाप होत आहे. उच्चभ्रू स्त्रिया या शाळेत येणाऱ्या नवीन मुलांच्या आयांना जोखून पाहत असतात. त्या कशा दिसतात, त्यांचे कपडे, त्यांच्या नवऱ्यांचे व्यवसाय आणि अर्थातच मुलांची हुशारी ! काही वेळा, 'गरीब मुलांना प्रवेश परीक्षेत यश मिळते, आणि आमच्या मुलांना मिळत नाही', याचे वैषम्यही त्यांना वाटते आहे.

या वागणुकीचे एका नागरिकाने असे विश्लेषण केले आहे की 'या महिलांना स्वतःचे कर्तृत्त्व दाखवायला दुसरीकडे कुठेच संधी मिळत नाही. त्यामुळे त्यांचे सर्वस्व त्यांच्या मुलांच्या यशापयशातच हरवलेले असते.'

हे असे टोकाचे व्यावसायिक-स्पर्धात्मक वातावरण कुठवर जाणार ? अनेक सुधारणांचे नारे देऊनही जपानमधील शिक्षण व्यवस्थेचे, मुलांच्या डोक्यात निरर्थक माहिती कोंबणे चालूच आहे. त्यातून मुलांची स्वतंत्र विचारक्षमता नाहीशी होत आहे; स्वयंशिक्षणाची ओढ नाहीशी होत आहे. संपूर्ण शिक्षणव्यवस्था शासकीय नियंत्रणाने ग्रासली जात आहे. केवळ ठोकळेबाज होत आहे; या गोष्टी आता हळूहळू सुजाण पालकांच्या ध्यानी येऊ लागल्या आहेत. शाळांतील यश आणि जीवनांतील यश यात पडणारे अंतर त्यांना उमजू लागले आहे. शाळांतून मध्येच गळती झालेली, अल्पवेळ नोकऱ्या करून शिक्षण करणारी किंवा शाळासोडून कामात शिरणारी मुलेच जेव्हा अत्याधुनिक व्यवसायांत यशस्वी होताना दिसू लागली आहेत, तेव्हा तर, या स्पर्धात्मक आणि स्पर्धेच्या पायावर उभ्या राहिलेल्या शिक्षणव्यवस्थेवरचा त्यांचा विश्वासच उडू लागला आहे.

ही पालकमंडळी आता, एकीकडे पश्चात्ताप व्यक्त करू लागली आहेत तर दुसरीकडे पर्यायी शाळांचा शोध घेऊ लागली आहेत. (चौकट पाहावी) सारुकी मोटोको ही आपल्या १३ वर्षांच्या मुलाची कथा नि व्यथा सांगते आहे : अनेक वर्षे

वाट पाहिल्यावर झालेला हा मुलगा. प्राथमिक शाळेत चमकलेला. त्याला चांगल्या माध्यमिक शाळेत प्रवेश मिळावा म्हणून, जुकूमध्ये म्हणजे प्रायव्हेट क्लासमध्ये घातला. महिन्याला १८०० डॉलर्स एवढी फी देऊन. सकाळपासून दुपारी तीनपर्यंत शाळा, व पुन्हा पाच ते रात्री नऊपर्यंत क्लास. रात्री घरी परतल्यावर टीव्हीसमोर

## नव्या दिशेकडे....

*स्पर्धेच्या युगात अग्रस्थानी असलेल्या जपानमधील शाळाही 'पळा ! पळा! कोण पुढे पळतो !' या तत्त्वावर आधारित शिक्षण देत आहेत. पण 'अति तेथे माती' या न्यायाने स्पर्धेच्या अतिरेकाचे दुष्परिणाम आता जपानमधील नागरिकांना जाणवत असून तेथील जागरूक पालक आता तणावरहित शिक्षण देणाऱ्या पर्यायी शाळांच्या शोधात आहेत. अशा पालकांची गरज ओळखून स्पर्धाविरहित, तणावरहित आनंददायी शिक्षण देणारी 'ड्रीम प्लॅनेट इंटरनॅशनल स्कूल' ही शाळा तेथे गेल्या वर्षी सुरु करण्यात आली आहे.*

*शिक्षणपद्धतीत आमूलाग्र बदल करून मुलांच्या व्यक्तिमत्त्वविकासाला महत्त्व देऊन, त्यांच्यात स्वयंअध्ययनाची गोडी निर्माण करण्याचे प्रयत्न या शाळेतर्फे करण्यात येत आहेत. शिराई तोमोको या सत्तावीस वर्षीय तरूणीने कायद्याचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर जपानमधील शिक्षणव्यवस्थेचा अभ्यास केला. यातून त्यांना शाळेचे, शिक्षणाचे जे स्वरूप आढळले ते अतिशय निराशाजनक होते. त्यामुळेच नवी पिढी चांगली व्हावी, स्पर्धेच्या ताणतणावापासून मुक्त असावी यासाठी त्यांनी या शाळेची स्थापना केली.*

*नेहमीचाच पुस्तकी अभ्यासक्रम, परीक्षापद्धती, व मूल्यांकनपद्धती या सर्व घटकांना अत्यल्प महत्त्व देऊन वेगळ्या दिशेने जाण्याचा प्रयत्न ही शाळा करीत आहे. तेथील विद्यार्थ्यांना अनेक गोष्टी करण्याची मुभा आहे. संगणकप्रिय मुलांना संगणकावर खेळता खेळता गणित शिकण्याची सोय आहे, तसेच झाडाच्या सावलीत निवांतपणे बसून वाचन करण्याचीही सोय आहे. नृत्य, नाट्य, संगीत, विज्ञान, गणित, भाषा हे सर्व विषय तिथे अतिशय अनौपचारिकरीत्या शिकता येतात. सहा ते अठरा वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी ही शाळा असून विद्यार्थ्यांचे सुप्त गुण व आवड-निवड आणि कल ओळखून त्यांना तसे मार्गदर्शन केले जाते.*

*स्पर्धा व ताण यांनी त्रस्त झालेल्या जपानमधील चोखंदळ पालकांच्या पसंतीस ही शाळा उतरली आहे. पर्यायी शाळांची मागणी जपानमध्ये वाढत असून शिक्षण पद्धतीत काही नवे बदल व्हावेत अशी अपेक्षा समाजातून व्यक्त करण्यात येत आहे. जपानमधील विचारवंत, शैक्षणिक तज्ज्ञ यांची मान्यता या शाळेला मिळत आहे. जपानच्या सरकारमधील शिक्षण खात्यातर्फे शाळेच्या मुख्याध्यापिका शिपाई तोमोको यांना शिक्षणविषयक सुधारणांवरील चर्चेसाठी निमंत्रण देण्यात आले आहे, ही त्यांच्या यशाची पावतीच आहे.*

घाईघाईने जेवण उरकून गृहपाठ करायला बसायचे ते थेट मध्यरात्रीपर्यंत. खेळणे नाही, मित्रांमध्ये जाणे-येणे नाही, कसली करमणूक नाही. अभ्यास आणि फक्त अभ्यास. एवढे करूनही मुलगा प्रवेशपरीक्षेत नापास झाला. आणखी एक दिलेली संधीही त्याने घालवली. तो खूपच धास्तावला. कुणाशी बोलेना. मित्रांकडे जाईना. "हा आमच्या कुटुंबावरचा फार मोठा आघात होता. आम्ही तज्ज्ञांचा सल्ला घेतला. आता आम्ही सारेच सावरतो आहोत." असे सारूकी मोटोको पश्चात्तापाने सांगतात.

पालकांचा आता, ताणविरहित शिक्षण देणाऱ्या अशा पर्यायी शाळांचा शोध सुरू झाला आहे. वाढत्या प्रमाणावर विचारी पालक या स्पर्धेच्या खुळ्या कल्पनांतून बाहेर पडत आहेत. गेल्या वर्षी जपानमधील तीन ते पंधरा वयोगटांतील सुमारे १,२८,००० मुलांनी अशा पर्यायी नि मुक्त शाळांतून प्रवेश घेतला. काहींनी तर घरीच मुलांचे शिक्षण करणे पसंत केले. नुकतीच तिथे केवळ इंटरनेटच्या आधारे घरीच मुलांना स्वयंशिक्षणाची संधी देणारी, त्यांना रस असेल त्या त्या विषयांचे शिक्षण देणारी (आणि मुख्य म्हणजे परीक्षा न घेणारी) अशी शिक्षणसंस्था सुरू झाली आहे. शिवाय नवीन आर्थिक धोरणाच्या अंमलबजावणीमुळे जे लोक बेकारीत लोटले गेले आहेत, किंवा जी मुले शाळेतून गळती झालेली आहेत अशांसाठीही, ही संस्था शिक्षणाची सोय पुरवीत आहे.

आता जपानचे सरकारही जागे होऊ लागले आहे. तारावेकी केन हे जपानमधील शिक्षणात परिवर्तन घडवू पाहणारे एक शिक्षणाधिकारी आहेत. ते म्हणताहेत की, आम्ही शिक्षणसुधारणेच्या दिशेने पावले टाकत आहोत. येत्या दशकातच हे परिवर्तन दिसून येईल. विद्यापिठांच्या शिक्षणातील स्पर्धा कमी केली जाईल. निवड नुसत्या परीक्षांतील मार्कांवर आणि मुलांच्या पाठांतरांच्या परीक्षांवर न करता, त्यांच्यातील क्षमतांवर केली जाईल; त्यामुळे ज्याला जिथे प्रवेश हवा तिथे तो मिळू शकेल. आणि प्राथमिक शाळेसाठी तर प्रवेशपरीक्षाच असणार नाही."

परंतु शिक्षणात मूलभूत परिवर्तन आणि तेही त्वरेने घडवून आणणे हा सरकारनामक व्यवस्थेचा धर्मच असत नाही; हा अनुभव तर सार्वत्रिकच आहे !

■■

जागतिक

# सर्जनशीलतेचे बाळकडू आणि शिक्षण

**आ**पल्या प्राथमिक शिक्षणात आमूलाग्र परिवर्तन करायला हवे आहे. हे परिवर्तन जसे शिक्षणाच्या पद्धतींमध्ये करायला हवे आहे तसेच ते शिक्षणाच्या आशयातही करावे लागणार आहे. साहजिकच बदलत्या आशयानुसार अभ्यासक्रमही बदलतील. मुख्य गोष्ट करायला हवी आहे ती म्हणजे, प्राथमिक शिक्षण (आणि तत्पूर्वीचे बालशिक्षण) नव्या शैक्षणिक पायावर उभे करायला हवे. हा पाया कोणता व कसा असावा याचे काहीसे दिग्दर्शन, 'विविध बुद्धिमत्तां'च्या सिद्धांताने केले आहे.

हा सिद्धांत असे सांगतो की प्रत्येक बालकाला उपजतच काही, कमी-अधिक तीव्र असलेल्या बुद्धिमत्तांचा संच प्राप्त झालेला असतो. आणि योग्य वातावरण पुरवून या बुद्धिमत्तांचा शोध जसा घेता येतो, तशीच त्यांची वृद्धीही करता येते. हे शोध आणि वृद्धीचे दुहेरी कार्य करण्याची जबाबदारी प्राथमिक शाळांची आहे. म्हणजे असे की बालकाला उपजत कशाकशात रस वाटतो आहे त्याचा शोध घेणे, त्याला उत्तेजन देऊन खत-पाणी घालणे आणि विविधांगी संधी पुरवून, त्याच्या उपजत बुद्धिमत्तांची वाढ कशी होईल हे पाहणे, हे आपल्या प्राथमिक शाळांचे काम असले पाहिजे.

योग्य शैक्षणिक वातावरण पुरवून जर बालवयातच उपजत बुद्धीला पुरेसा वाव दिला तर मनुष्य आपल्या जीवनात मोठे कर्तृत्व दाखवू शकतो; व आपल्याबरोबर आपला समाजही प्रगतीपथावर नेऊ शकतो. मनुष्य हा निर्माणक्षम आहे, सर्जनशील आहे, नवनिर्मितीची अफाट क्षमता त्याच्यामध्ये आहे. यामुळेच मनुष्य प्राणीजीवनापेक्षा वेगळ्या पातळीवर जीवन जगतो आहे. भाषेची निर्मिती, मूल्यांची जोपासना, कलात्मक अभिव्यक्ती, शास्त्रीय विचारपद्धती, तंत्रज्ञानाचा विकास, या व अशाच काही बाबी या मानवी जीवनाचे व्यवच्छेदक लक्षण बनल्या आहेत.

साधारणपणे, मोठे संशोधक, प्रसिद्ध कलावंत किंवा बुद्ध, ख्रिस्त, गांधी अशा अलौकिक व्यक्ती यांचा समावेश आपण महान व्यक्तींमध्ये करतो. या व्यक्ती आपापल्या क्षेत्रात सर्जनशील म्हणून नावारूपाला आलेल्या असतात. त्यांची निर्माणक्षमता अलौकिक असते. आणि त्यामुळे मानवी इतिहासात त्यांची नावे अजरामर होतात. सर्वच लहान मुले मोठेपणी या तोडीची होतात असे नाही; परंतु सर्वच अशी मोठी माणसे केव्हातरी लहान मुलेच होती. मग, अगदी लहानपणीच त्यांच्यातील 'मोठेपण' दिसून आले होते का? 'मुलाचे पाय पाळण्यात दिसतात' हा वाक्प्रचार क्रियाशील महान अशा सर्वच व्यक्तींना लावता येतो का? या मोठ्यांचे लहानपण कसे होते? या प्रश्नांची उत्तरे मिळाली तर कदाचित आपल्याला निर्माणक्षम व्यक्तींच्या मोठेपणाचा मार्ग उलगडू शकेल. मनुष्य निर्माणक्षम किंवा सर्जनशील ठरण्यासाठी कोणकोणत्या गोष्टी त्याच्याबाबतीत घडल्या पाहिजेत, लहानपणी घरी किंवा शाळांतून घडविल्या पाहिजेत, हे कळले तर एकूणच शिक्षणात आणि त्याकरवी समाजजीवनात फार मोठा बदल घडवून आणता येईल.

अशातऱ्हेच्या प्रश्नांची उत्तरे शोधणारा एक अभ्यास अलीकडेच प्रसिद्ध करण्यात आला आहे.★ मिहाली सिकझेनमिहाली या अमेरिकेतील शिकागो विद्यापीठाच्या मानसशास्त्र विषयाच्या प्राध्यापकाने जवळजवळ तीस वर्षे, माणसातील निर्माणक्षमतेचा अभ्यास करून आणि वेगवेगळ्या क्षेत्रांतील ९१ संशोधकांचा व कलावंतांचा प्रत्यक्ष अभ्यास करून आपला ताजा ग्रंथ लिहिला आहे.★ या ग्रंथातील सातव्या प्रकरणात या महान संशोधक-कलावंतांच्या बालपणाचा वेध घेऊन काही महत्त्वाचे निष्कर्ष काढलेले आहेत. ते केवळ मनोरंजकच नव्हे तर शिक्षणात काही मूलभूत परिवर्तन करू पाहणाऱ्यांना मार्गदर्शकही ठरतील.

या ग्रंथाचा महत्त्वाचा निष्कर्ष असा आहे की, माणसांना अधिक सर्जनशील विचाराला प्रवृत्त करण्यापेक्षाही अधिक, वातावरणात योग्य ते बदल घडवून आणून माणसाची सर्जनशीलता वाढवता येईल. तसेच, खरोखर एखादी सर्जनशील कृती-निर्मिती, अंधारात एकदम दिवा लागावा तशी अकस्मात आतून उद्‌भवणारी गोष्ट नाही तर तिच्यामागे अनेक वर्षांचे कठोर परिश्रम असावे लागतात. ग्रंथाच्या शेवटच्या भागात वातावरणात बदल घडवून आणण्यासाठी प्रत्यक्षात काय करावे लागेल याचेही तपशीलवार विवेचन करण्यात आले आहे.

---

★ Creativity : Flow and the Psychology of discovery and invention by MIHALY CSIKSZENTMIHALYI (1996)

मिहाली यांनी बालपणाविषयी एक ठाम विधान केले आहे. ते म्हणतात, 'लहान मुले बुद्धिमत्तेची चमक खूपच दाखवतात; पण ते सर्जनशील मात्र खचितच नसतात, कारण, सर्जनशीलतेमध्ये, विचार करण्याच्या किंवा एखादी कृती करण्याच्या पद्धतीतच केलेला बदल अनुस्युत असतो; आणि असा बदल करण्यासाठी जुन्या विचार किंवा कृतीपद्धती यांवर पक्की मांड असावी लागते. कितीही प्रगाढ बुद्धिमत्तेचे मूल हे करू शकत नाही.'

मग आपल्या पुढील आयुष्यात जी आपल्या सर्जनशीलतेने तळपलेली अशी मोठी माणसे त्यांच्या त्यांच्या बालवयात कशी होती? किंवा अशा मंडळीच्या बालवयात अशा कोणत्या घटना घडल्या आहेत की त्यामुळे ती मंडळी मोठेपणी उच्च कोटीची सर्जनशीलता दर्शवू शकली ?

रसायनशास्त्रज्ञ पॉलिंग, कादंबरीकार रॉबर्टसन डेवीस किंवा थोर कलावंत रवी शंकर यांनी बालवयातही आपल्या बुद्धिमत्तेची चमक दाखविल्याचे दाखले आहेत. अशी अर्थातच अनेक उदाहरणे आहेत. परंतु याउलटही अनेक उदाहरणे आढळतात. तरूणपणीसुद्धा आईन्स्टीन अलौकिक प्रतिभेचा म्हणून ओळखला जात नव्हता; किंवा विस्टन चर्चिल तर आयुष्याच्या मध्यापर्यंत त्याच्या राजकीय नेतृत्त्वगुणांनी तळपलेला नव्हता. याचाच अर्थ असा की उच्च पातळीच्या सर्जनशीलतेसाठी, ज्याला आपण सामान्यपणे घरांतून आणि शाळांमधून 'बुद्धिमत्ता' म्हणून संबोधतो, त्याची फारशी गरज असतेच असे नाही. तर खरी गरज असते ती खूप मोठी जिज्ञासा जागृत असण्याची. ज्यांनी ज्यांनी वेगवेगळ्या क्षेत्रात खूप मोठे योगदान दिले आहे त्या सर्वच महान शास्त्रज्ञांच्यात, कलावंतांच्यात कोणती गोष्ट समान असेल तर ती म्हणजे त्यांची बालपणापासून असलेली, आजुबाजूच्या सृष्टीविषयीची विलक्षण उत्सुकता, जिज्ञासा, कुतुहल, किंवा कशानाकशात तरी विलक्षण रस वाटणे.

याबाबतीतली चार्लस् डार्विनची लहानपणची एक रोचक गोष्ट आहे :

आपल्या घरापासच्या रानावनात हिंडत असताना, चार्लस् डार्विनचे लक्ष एका मोठ्या भुंग्याने वेधून घेतले. हा भुंगा लपण्यासाठी म्हणून झाडाच्या फांदीवरून तुरूतुरू धावत होता. चार्लसने असे बरेच भुंगे जमविले होते. पण हा जरा वेगळा होता नि तसा मात्र त्याला अजून मिळाला नव्हता. त्याने झाडाकडे धाव घेतली आणि सालीमागे लपलेला भुंगा शोधून काढला. तेव्हा त्याला तसेच आणखी दोन भुंगेही तेथेच लपलेले आढळले. हे भुंगे इतके मोठे होते की फार तर एकच

भुंगा त्याच्या हातात मावत होता. मग त्याने दोन हातात दोन भुंगे धरले आणि उरलेला तिसरा चक्क आपल्या तोंडात धरून त्याने घराकडे धाव घेतली. तोंडातला भुंगा मात्र सारखा घशाच्या वाटेने निसटू पाहत होता.

थोर समाजशास्त्रज्ञ डेव्हिड रिसमन याने म्हटले आहे की, 'मला कशाने प्रेरणा दिली ? असे तुम्ही विचारलेत, तर मी सांगेन की केवळ माझ्या जिज्ञासेने !' हे विधान उदधृत करताना मिहाली यांनी म्हटले आहे की, डेव्हिड रिसमन काय किंवा चार्लस् डार्विन काय, ही दोघेही त्यांच्या बालपणी, ज्याला आपण बुद्धिमान किंवा प्रतिभावान असे म्हणतो, तशी मुळीचचं नव्हती. पण त्यांना निदान एखाद्या गोष्टीत तरी खोलवरचे कुतुहल किंवा विलक्षण जिज्ञासा होती. कशात तरी त्यांना रस वाटत असे.

परंतु असा रस तरी कसा निर्माण होतो ?

मोठ्या वयात सर्जनशील माणसे आपल्या अंगिकारलेल्या कामावर प्रेम करू शकतात. आपला त्यातील रस टिकवू किंवा वाढवू शकतात; परंतु, बालपणी मात्र असा रस निर्माण होण्यासाठी एखादी प्रेरणा आवश्यक असते. मग ती कदाचित् इतरांच्या पुढे गेल्याची असेल किंवा मोठ्यांनी केलेल्या कौतुकाची अथवा आपल्याकडे खासकरून लक्ष दिल्याची असेल.

यामध्ये अर्थातच आई-वडिलांचा, पालकांचा वाटा खूप महत्त्वाचा असतो. मिहाली म्हणतात की, बहुतेकांच्या बाबतीत, कुतुहल जागृत करणे किंवा त्याला दिशा देणे याबाबतीत आई-वडिलांची भूमिका महत्त्वाची असते. 'काही वेळा पालकांचे त्यांच्या बालकांच्या बौद्धिक विकासात असलेले एकमेव योगदान म्हणजे, त्यांना समवयस्क प्रौढ व्यक्ती समजून वागवणे." मोठेपणातील कर्तृत्त्वाच्या क्षेत्रात लहानपणी रस निर्माण झालेला असतोच असे नाही; पण लहान वयातच जीवनातील विविध गोष्टींना अभिमुख होण्याची संधी मिळणे ही गोष्ट, बालकांना पुढील काळासाठी, सहाय्यभूत ठरते. ज्यांची आर्थिक स्थिती ओढग्रस्तीची असते, ज्यांना चांगल्या शाळा उपलब्ध नाहीत किंवा तीव्र प्रेरणा देणारे शिक्षक लाभत नाहीत अशांच्या बाबतीत त्यांच्या पालकांचे स्थान नि काम खूपच महत्त्वाचे ठरते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे उदाहरण यासंदर्भात खूपच बोलके आहे. मिहाली यांच्या संशोधनातही अशी अनेक उदाहरणे दिसून आली आहेत. कारण, त्यांनी केलेल्या मोठ्या शास्त्रज्ञ वगैरेंच्या अभ्यासात असे स्पष्ट झाले आहे की यातील सुमारे तीस टक्के लोकांची पार्श्वभूमी घरच्या गरिबीची किंवा मागासलेपणाची होती.

शेतकरी, कामगार किंवा स्थलांतरितांची ही मुले होती. तरीही ती महानतेप्रत पोचली होती. यांपैकी जवळजवळ प्रत्येकाच्या आई-वडिलांनी मुलांपुढे काही आदर्श ठेवले होते. खूप नि सतत वाचनात दंग असणारे आई-वडिल, कलांमध्ये झोकून देणारे, स्वतंत्र निर्णय घेण्याला प्रोत्साहन देणारे, आत्मसन्मानाची दीक्षा देणारे किंवा ऐपत फारशी नसूनही मुलांना दूरच्या सफरी घडवून आणणारे असे पालक या सर्जनशील व्यक्तींना लाभले होते. अर्थात् आपले चांगल्यापेक्षा वाईटच उदाहरण आपल्या पाल्यांपुढे ठेवणारे आई-बापही क्वचित् आढळतात. सदोदित घरी भांडणारे, केवळ भौतिक सुखाची लालसा ठेवणारे, स्वतःच्या आयुष्याबद्दल असमाधानी असणारे असे पालक आपल्या पाल्यांसमोर, काय असू नये याचेच उदाहरण ठेवीत असतात. पण मग, काही वेगळ्याच व्यक्तींच्या प्रेरणांतून ही व्यक्तिमत्त्वे घडतात. यात तर शिक्षकांची भूमिका उल्लेखनीय आहे.

या अभ्यासामधून दृष्टोत्पत्तीस आलेली एक गोष्ट आपण सदैव लक्षात ठेवली पाहिजे. ती अशी की, हे पालक मुलांना केवळ बौद्धिक बाबतीत सहाय्य करणारे नव्हते; ते आपल्या मुलांना केवळ भौतिक जीवनाची दिशा देणारे नव्हते. त्याहूनही अधिक ते स्वतः काही मूल्ये जपणारे होते आणि आपल्या मुलांसाठी अशा मूल्यांचा वारसा ठेवणारे होते. आपल्या मुलांची यथायोग्य वागणूक घडवणारे असे ते होते. त्यांपैकी अनेकांनी, आपल्या आई-वडिलांनी आपल्यात रुजविलेल्या प्रामाणिकपणाचे मुक्तपणे उल्लेख केले आहेत. हा प्रामाणिकपणा खऱ्याखुऱ्या संशोधनातील उपयुक्त सहकारी असतो. संशोधकांची त्यांच्या सहकाऱ्यांमधील विश्वसनीयता या प्रामाणिकपणावर अवलंबून असते.

या अभ्यासामधून ठळकपणे असे आढळले आहे की, जे लोक उत्तर आयुष्यात थोर कामगिरी करतात अशांना बालपणी एक तर अतिशय चांगले सहाय्य लाभले आहे किंवा वंचितांचे वेदनामय पण आव्हानात्मक आयुष्य त्यांच्या वाट्याला आहे आहे. या दोन्हींच्या मधली स्थिती मात्र अभावानेच आढळून आली आहे. असेच चित्र कौटुंबिक पार्श्वभूमीच्या बाबतीतही दिसून येते. बऱ्याच म्हणजे तीस टक्के सर्जनशील व्यक्ती गरीब, मागासलेल्या कुटुंबांतून आल्या आहेत. आणि तेवढ्याच जवळपास म्हणजे ३४ टक्के व्यक्तींना बौद्धिक व्यवसायांतील कुटुंबांची पार्श्वभूमी लाभली आहे. इतरांमध्ये डॉक्टर्स, इंजिनियर्स, व्यापारी यांच्या कुटुंबांतील व्यक्ती आहेत. अत्यंत धक्कादायक माहिती अशी की समाजातील जो स्थिर उत्पन्न असलेला, संघटित क्षेत्रातील नोकरदारांचा मध्यमवर्गीय कुटुंबांचा वर्ग आहे, त्यांची

मुले फारशी सर्जनशील कर्तृत्त्व गाजवीत नाहीत. या अभ्यासात अशांची मुले केवळ १० टक्केच आहेत.

थोडक्यात असे की, एकतर जिथे बौद्धिक व्यवहार आहेत किंवा जेथे मूलभूत मूल्यांवर आधारित अशा वागणुकीचे धडे आहेत अशा कुटुंबांतील मुलेच फार मोठे सर्जनशील कर्तृत्त्व समाजातील वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये दाखवतात.

या साऱ्यामध्ये पठडीबद्ध शिक्षण देणाऱ्या शाळांचे काय योगदान आहे ? मिहाली यांनी असा निष्कर्ष काढला आहे की महान सर्जनशील व्यक्तींच्या आयुष्यात त्यांच्या शाळांचे योगदान अगदीच नगण्य आहे. असलेच तर ते त्यातील एखाद्या विशिष्ट शिक्षकाचे असते. एरवी सामान्यतः शाळांच्या भिंतीपलीकडील विश्वाबद्दल वाटणारे कुतुहल किंवा जिज्ञासा मारण्याचेच कार्य शाळा करताना आढळतात. आईन्स्टीन, पिकॅसो, टी. एस्. इलियट यांच्या कर्तृत्त्वात शाळेचा वाटा काहीही नाही. मिहाली म्हणतात त्याप्रमाणे, औपचारिक शिक्षण व्यवस्थेतील अफाट कष्ट, खर्च आणि आशा यांतून निष्पन्न काहीच होत नाही.

यासाठी तर या शाळांचा आणि औपचारिक शिक्षणव्यवस्थेचा गांभीर्याने नि त्वरेने विचार करायची वेळ आली आहे !

■■

*मुलाला नैसर्गिक जिज्ञासा, शिकण्याची उत्कंठा अगदी प्रथमपासूनच असते, आणि तिला सुबुद्धपणे, सातत्याने प्रोत्साहन देण्याची आवश्यकता असते; म्हणजे ती जिज्ञासा जिवंत व अविकृत राहील व तीच मुलाला हळूहळू अनेक विषयांचा अभ्यास करण्यास साहाय्यभूत होईल. मुलांमध्ये असणाऱ्या ह्या शिकण्याच्या उत्कंठेला नेहमी प्रोत्साहन दिले गेले तर गणित, भूगोल, इतिहास, शास्त्र किंवा अन्य कोणत्याही विषयांचा त्याचा अभ्यास म्हणजे त्या मुलाला व शिक्षकालासुद्धा समस्या ठरणार नाही. जेव्हा सुखाने, आपुलकीने, विचारपूर्वक, जिव्हाळ्याने वागण्याचे वातावरण असते तेव्हा शिक्षण सहज-सुलभतेने होऊ शकते.*

*(जे. कृष्णमूर्ती यांच्या 'भावी जीवन' या पुस्तकातून)*

**अर्जेंटिना**

# आर्थिक विषमतेतून संघर्ष वाढणार ?

**वि**कसित राष्ट्रे ही आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बँक, जागतिक व्यापार संघटना अशा काही संस्थाच्या मार्फत विकसनशील राष्ट्रांच्या अर्थव्यवस्थेवर ताबा मिळविण्याचा प्रयत्न करीत असतात, हा एक आरोप विकसनशील राष्ट्रांमधील अनेकजण नेहमीच करीत असतात. विकसित राष्ट्रांची खुली अर्थव्यवस्था, मुक्त व्यापार, औद्योगिक धोरणे यांवरही नेहमी टीका होत असते. भांडवलशाही अर्थव्यवस्थेमुळे गरीब व श्रीमंत यांच्यातील दरी रुंदावते आणि त्यातून आर्थिक सामाजिक संघर्ष वाढतो असेही म्हटले जाते. या सर्व विधानांची पुष्टी करणारी एक घटना लॅटिन अमेरिकेतील अर्जेंटिना येथे घडली आहे.

अर्जेंटिनाच्या सरकारने आंतरराष्ट्रीय नाणेनिधीबरोबर केलेल्या कराराप्रमाणे सरकारी तिजोरीतील तूट भरून काढण्यासाठी अंदाजपत्रकात काही कपात करण्याचे सुतोवाच केले मात्र, की सरकारला जनतेच्या रोषाला सामोरे जावे लागेल, असा कडक इशारा अर्जेंटिनाचे अध्यक्ष फर्नांडो दे ला रुआ यांना नागरिकांकडून देण्यात आला. मे महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात सरकारच्या निर्णयाविरुद्ध अर्जेंटिनातील आठ प्रदेशांमध्ये मोठ्या प्रमाणावर निदर्शने करण्यात आली. निदर्शकांनी अनेक रस्ते बंद केले आणि हळूहळू ही निदर्शने हिंसक झाली. साल्टा येथील निदर्शकांमध्ये सुमारे २०० बेरोजगारांचा समावेश होता. या लोकांनी बोलिव्हिया देशाकडे जाणारा मार्ग बंद केला तेव्हा पोलिस व सीमारक्षक एकत्र आले आणि त्यांनी निदर्शकांना पांगविण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी झालेल्या संघर्षात अनेकजण जखमी झाले व काही सरकारी इमारतींचे नुकसान झाले. चाको व इतर काही भागातही हिंसक निदर्शने झाली.

या निदर्शनांमधून अर्जेंटिनामधील गरीब व श्रीमंत यांच्यातील आर्थिक व सामाजिक संघर्ष पुढे आला आहे. 'आहे रे' आणि 'नाही रे' यांच्यातील दरी

ठळकपणे दिसून आली आहे. अर्जेंटिनामधील ब्युनॉसएअर्स सारखी काही मोजकी शहरे वगळता छोट्या गावांमध्ये श्रीमंतीचे वारे अजिबात पोचलेले नाही. शहरे विरुद्ध खेडी असाही संघर्ष यातून पुढे येईल अशी भीती विचारवंतांना वाटते. साल्टा भागात तर ५६ टक्क्यांपेक्षा अधिक नागरिक दारिद्र्यरेषेखाली असून त्यांना दोनवेळचे पोटभर जेवण मिळण्याचीही मारामार आहे.

या आर्थिक सुधारणांच्या प्रक्रियेत जे कनिष्ठ मध्यमवर्गीय अधिक मागे पडले आहेत, त्यांची संख्या या निदर्शकांमध्ये जास्त होती. स्थानिक व राष्ट्रीय पातळीवरील सरकारचा अकार्यक्षम व गलथान कारभार आणि सार्वजनिक खर्चातील कपात यांविरूद्ध ही निदर्शने होती. सरकारी अधिकारी व नेतेमंडळी यांच्यावर मोठ्या प्रमाणात खर्च करण्यात येतो, असे निदर्शकांचे म्हणणे आहे. गरिबांची संख्या जास्त असलेल्या साल्टा भागातील सरकारी अधिकारी चैनीत राहतात, त्यांच्या पगारात व खर्चात कपात करण्यात येत नाही, हे नागरिकांना कळून येते आणि ज्या भागात अशी तफावत आहे तिथेच जमावाने रौद्र रूप धारण केले असे मत अर्जेंटिनातील अर्टेमिओ लोपेझ या विचारवंताने व्यक्त केले आहे.

संतप्त नागरिकांच्या भावनांची दखल घेऊन अर्जेंटिनाच्या सरकारने गरिबांसाठी वेगळा निधी राखून ठेवण्यात येईल, बेरोजगारांना भत्ता देण्यात येईल अशा छोट्या छोट्या उपाययोजना करून सारवासारव करण्याचा प्रयत्न केला आहे. तथापि तो पुरेसा नाही.

अर्जेंटिनाची आर्थिक परिस्थिती सध्या खालावलेली आहे, औद्योगिक उत्पादनही वाढलेले नाही. परकीय गुंतवणुकदारही गुंतवणूक करण्यास तयार नाहीत, अशा परिस्थितीत असे आर्थिक संघर्ष होणे अटळच आहे.

वरील घटना काही प्रमाणात भारताचे प्रतिनिधित्वही करू शकेल. भारत आणि अर्जेंटिना ही दोन्ही विकसनशील व तिसऱ्या जगातील राष्ट्रे आहेत, एवढा उल्लेख येथे पुरेसा ठरावा.

(संदर्भ - 'द इकॉनॉमिस्ट' २० मे ते २६ मे २०००)

■■

**आंतरराष्ट्रीय**

# आर्थिक समानतेसाठी राष्ट्रसंघ प्रयत्नशील

जागतिकीकरणाचे व खुल्या अर्थव्यवस्थेचे फायदे-तोटे या चर्चेत आता संयुक्त राष्ट्र संघानेही सहभागी व्हायचे ठरविले आहे. एकविसाव्या शतकात जगाची वाटचाल आर्थिक समानतेकडे व्हावी, गरिबी व उपासमारी दूर व्हावी यासाठी राष्ट्रसंघाने निर्णायकी व कृतीशील भूमिका घेतली आहे. राष्ट्रसंघाने जागतिक अर्थव्यवस्थेच्या दृष्टिकोणातून आजपर्यंत भरीव कार्य म्हणता येईल अशी कामगिरी केलेली नाही. पण आता आर्थिक प्रश्नांकडे अजिबात दुर्लक्ष न करण्याचे राष्ट्रसंघाचे सरचिटणीस कोफी अन्नान यांनी ठरविले आहे.

'संयुक्त राष्ट्र संघ' हा आंतरराष्ट्रीय संघ असला तरी तिथे फक्त चर्चाच घडतात, या चर्चांमधून फारसे काही निष्पन्न होत नाही, राष्ट्र-संघाच्या मताला फारशी किंमत नाही, अशी राष्ट्रसंघाची निर्माण झालेली प्रतिमा मोडून एक क्रियाशील संघ अशी त्याची प्रतिमा तयार व्हावी, यासाठी कोफी अन्नान प्रयत्नशील आहेत. राष्ट्रसंघाची या शतकातील शेवटची शिखर परिषद येत्या सप्टेंबरमध्ये होणार आहे. त्या शिखर परिषदेत एकविसाव्या शतकात राष्ट्रसंघाचा आर्थिक, सामाजिक दृष्टिकोण कसा असेल याविषयीची चर्चा होईल.

या शिखर परिषदेची पूर्वतयारी म्हणून राष्ट्रसंघातर्फे एक छोटा माहितीवजा अहवाल प्रसिद्ध करण्यात आला आहे. त्यात जागतिकीकरणाचे फायदे गरीब व विकसनशील राष्ट्रांनाही मिळावेत आणि जगातील गरीबी व उपासमारी दूर व्हावी यासाठी राष्ट्रसंघाने विशेष प्रयत्न करावेत असे म्हणण्यात आले आहे. आर्थिक समानतेसाठी राष्ट्रसंघ महत्त्वाची भूमिका बजावू शकतो. गरिबी व उपासमारी दूर करण्याचा प्रयत्न हा केवळ 'दया' म्हणून नाही तर यामुळे हिंसाचार व युद्ध होण्याच्या शक्यता वाढतात म्हणूनही हा प्रश्न महत्त्वाचा आहे, असे कोफी अन्नान यांनी या अहवालात स्पष्ट केले आहे.

श्री. अन्नान यांनी शब्दांचे जंजाळे न वाढविता, सोप्या शब्दात पण ठामपणे जागतिकीकरणाबद्दल आपली मते मांडली आहेत. जागतिकीकरणाचे व

माहितीतंत्रज्ञानाचे फायदे असमानतेकडेच झुकणारे आहेत, त्यामुळे जगातील कोट्यवधी नागरिक अज्ञानाच्या गर्तेत आणखी खोल अडकण्याची शक्यता निर्माण झाली आहे. असे होऊ नये यासाठी विकसनशील राष्ट्रांसाठी राष्ट्रसंघातर्फे माहिती व तंत्रज्ञान सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. मागास देशांना आरोग्य व औषधविषयक माहिती मिळावी यासाठी इंटरनेटची मदत घेण्यात येणार असून दहाहजार नव्या साईट्स तयार करण्यात येणार आहेत. दूरसंचार क्षेत्रातील अग्रगण्य असलेली 'एरिक्सन' ही कंपनी याकामी राष्ट्रसंघाला मदत करणार आहे.

जग आणखी चांगले व्हावे यासाठी राष्ट्रसंघाने प्रयत्न करण्याची गरज आहे असे त्यांनी स्पष्ट केले आहे. गरिबी व उपासमारीचा प्रश्न चुटकीसरशी संपणारा नाही याची आपल्याला जाणीव आहे. पण आज जगातील २२ टक्के लोक या प्रश्नाने ग्रस्त आहेत. २०१५ पर्यंत ही टक्केवारी किमान निम्म्याने कमी व्हावी, ती १०-१२ टक्के व्हावी यासाठी तरी युद्धपातळीवर प्रयत्न करण्याची गरज आहे. अन्यथा यातून सामाजिक संघर्ष, युद्ध होतील असा इशारा त्यांनी यावेळी दिला आहे. आर्थिक समानतेच्या दृष्टीने पावले उचलण्याच्या कोफी अन्नान यांच्या भूमिकेचे स्वागत इतर राष्ट्रांनी करायला हवे. सप्टेंबरच्या शिखर परिषदेत त्यांना सर्व राष्ट्रांनी पाठिंबा दिला तर नव्या शतकात आंतरराष्ट्रीय पातळीवर चांगले बदल होण्याचा काळ दूर नाही.

(संदर्भ - 'द इकॉनॉमिस्ट' ८ एप्रिल २०००)

■■


*माणसाला स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव असते व म्हणून माणसाला स्वतःसाठी अस्तित्व असते. स्वतःच्या जीवनाचे प्रयोजन त्याने स्वतः निर्माण केले पाहिजे. त्याने ते दुसरीकडून उचलले तर तो आपले स्वत्व गमावून बसेल. पण माणसाचे अस्तित्व स्वतःसाठी असते त्याप्रमाणे इतिहासाने समृद्ध केलेल्या परंपरेने घडविलेले असेही ते अस्तित्व असते. अनेक भिन्न नीतिमत्तांनी संपन्न केलेली काहीशी विस्कळित अशी मूल्यमापनाची भाषा ह्या समाजात जगत असतानाच माणसाने आत्मसात केलेली असते. इतिहासाचा हा वारसा आपण समजून घेतला नाही तर आपण स्वतःला समजू शकणार नाही;*

फ्रान्स

# समानतेच्या तत्त्वाचा विजय

**स्वा**तंत्र्य, समानता आणि बंधुता या त्रिसूत्रीचा जयघोष करीत झालेल्या फ्रेंच राज्यक्रांतीने जगाच्या इतिहासात महत्त्वपूर्ण स्थान मिळविले. त्यानंतर १८४० च्या दशकात फ्रान्समधील पुरूषांना महत्त्वाचे राजकीय अधिकार मिळाले. पण तेथील स्त्रियांना मात्र राजकारणातील समानता मिळण्यासाठी पुढे १५५ वर्षे वाट पाहावी लागली. १९४४ मध्ये फ्रान्समधील स्त्रियांना मतदानाचा अधिकार मिळाला तरी प्रत्यक्ष राजकारणातील, निर्णयप्रक्रियेतील स्त्रियांची संख्या अत्यल्प होती. अमेरिका व इतर युरोपियन देशांमधील राजकारणात स्त्रियांचे प्रमाण त्यामानाने अधिक होते. (तक्ता पाहावा.)

**विविध देशांमधील संसदेसाठी अलीकडे झालेल्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये जिंकून आलेल्या स्त्री उमेदवारांची टक्केवारी**



फ्रान्समध्ये आतापर्यंत तेथील संसदेच्या कनिष्ठ सभागृहात एकूण सदस्यांपैकी फक्त १०.९ टक्के स्त्रिया होत्या. सिनेटमध्ये फक्त ५.९ टक्के तर मेयर (महापौर) पद मिळवू शकलेल्या स्त्री-पुरूषांमध्ये स्त्रिया फक्त ८ टक्के होत्या. १९९८ मध्ये फ्रान्समध्ये झालेल्या प्रादेशिक निवडणुकीत एकूण जागांपैकी फक्त ७.८ टक्के जागांवर स्त्रिया निवडून आल्या. बावीस प्रादेशिक शासनांमधील फक्त एकाच ठिकाणी स्त्री प्रमुख होती.

आणि आता स्त्री-पुरूष समानतेच्या युगात वावरताना मात्र फ्रेंच सरकारने ही परिस्थिती सुधारण्याचा प्रयत्न केला आहे. फ्रान्समधील 'नॅशनल असेंब्ली'ने ३ मे २००० रोजी बहुमताने घेतलेल्या निर्णयानुसार सर्व राजकीय पक्षांसाठी निवडणुकीत पुरूष उमेदवारांइतकीच स्त्री उमेदवारांची संख्या असावी असा कायदा केला आहे. स्थानिक, प्रादेशिक व राष्ट्रीय अशा सर्व प्रकारच्या निवडणुकांसाठी हा कायदा लागू करण्यात आला आहे. घटना दुरुस्ती करून हा कायदा करण्यात आल्याने समानतेच्या युगासाठी ही एक ऐतिहासिक घटना ठरली आहे. एखाद्या पक्षाकडे पुरुष उमेदवारांएवढ्या स्त्री उमेदवार नसतील तर त्या परिस्थितीत अपवादानेच पुरूष उमेदवारांची संख्या २ टक्क्यांनीच जास्त असली तर चालेल, असे कायद्यात नमूद करण्यात आले आहे. अर्थात यासाठीही राजकीय पक्षाला दंड मात्र भरावाच लागणार आहे.

गेल्या वर्षभरात या कायद्याचा फ्रान्समधील बुद्धिवाद्यांनी, विचारवंतांनी, राजकारणी नेत्यांनी आणि स्त्रीवादी समर्थकांनी बारकाईने अभ्यास केला. त्यानंतरच आणि फ्रेंच राज्यक्रांतीच्या त्रिसूत्रीच्या तत्त्वांवर निष्ठा ठेवून असा कायदा करण्याच्या निर्णयावर शिक्कामोर्तब करण्यात आले.

भारतातदेखील राज्यकारभारातील स्त्रियांच्या आरक्षणाचा प्रश्न गाजतो आहे. राजकीय पक्ष आपापल्या संकुचित स्वार्थासाठी हा प्रश्न धसास लावत नाहीत. फ्रान्समधील या निर्णयामुळे तरी येथील परिस्थिती सुधारण्याच्या दृष्टीने पावले पडावीत अशी अपेक्षा करण्यास हरकत नाही. अर्थात फ्रान्समधील स्त्रियांनी दीडशे वर्ष वाट बघितली, भारताला स्वातंत्र्य मिळून पन्नासच वर्षे झाली आहेत, असा युक्तिवाद येथे करण्यात येऊ शकतो. त्यामुळे स्त्री-पुरुष समानतेचे समर्थक असणाऱ्यांनाच आपले घोडे जोराने पुढे दामटावे लागेल.

(संदर्भ - 'द इकॉनॉमिस्ट' १३ मे ते १९ मे २०००)

■■

भारत

# एक लोकशाही राष्ट्र ?

*[भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीने दि. २१ मे २००० रोजी "भारतात लोकशाही आहे ?" या विषयावर चर्चागटाची सभा आयोजित केली होती. त्यावेळी संस्थेच्या मंडळातील सदस्य डॉ. रामदास होनावर आणि प्रा. स. वा. कोगेकर यांनी सादर केलेल्या टिपणांवर उपस्थितांनी चर्चा केली. त्या चर्चेतील काही मुद्यांच्या आधारे हा लेख तयार करण्यात आला आहे.]*

लोकशाही हे लोकांचे, लोकांसाठी, लोकांनी चालविलेले राज्य अशी लोकशाहीची व्याख्या सर्वमान्य आहे. भारत हे जगातील एक मोठे लोकशाही राष्ट्र आहे असे म्हटले जाते, विशेषतः परदेशातील पाहुण्यांसमोर तर याचा फारच उदोउदो करण्यात येतो. तसे म्हटले तर भारतात लोकशाहीची मुख्य घटक असलेली न्यायव्यवस्था, निवडणूक यंत्रणा, विविध राजकीय पक्षांचा सहभाग, वृत्तपत्रे व प्रसारमाध्यमांचे स्वातंत्र्य, लोकनियुक्त केंद्र व राज्य सरकार हे सर्व काही सुरळित आहे. पण तरीही लोकशाहीच्या व्याख्येप्रमाणे भारतात लोकशाही आहे का ? याचा विचार गांभीर्याने करण्याची वेळ आली आहे.

लोकशाही राष्ट्र कसे असावे याचे काही निकष आहेत. आपल्या घटनेने नागरिकांचे मूलभूत हक्क मान्य केले आहेत, तसेच घटनेत मूलभूत कर्तव्यांचाही उल्लेख आहे. लोकशाहीत कल्याणकारी राज्याची (welfare state) कल्पना आहे, लोकनियुक्त सरकारने लोकोपयोगी निर्णय घ्यावे, असे गृहीततत्त्व आहे. या निकषांप्रमाणे भारतातील लोकशाहीला 'लोकशाही' म्हणायचे का ? असा प्रश्न पडतो. कारण मूलभूत हक्कापासून वंचित असणारा समाज आपल्या हक्कांसाठी झगडताना क्वचितच आढळतो. किंबहुना हक्काची पायमल्ली होत असतानाही मूग गिळून गप्प बसणारे येथे संख्येने जास्त. (आणीबाणीच्या वेळेचा अपवाद वगळता.) जेथे हक्काची जाणीव नाही तेथे कर्तव्याबाबत तर बोलायलाच नको. याशिवाय भारतात शिक्षण न घेऊ शकलेल्या किंवा शिक्षण ज्यांच्यापर्यंत

पोहचू शकले नाही अशांची संख्या खूपच जास्त आहे. त्यामुळे लोकशाही सुयोग्य रीतीने राबविण्यासाठी अत्यावश्यक घटक असलेल्या सुशिक्षित समाजाची वानवा आणि जे सुशिक्षित आहेत त्यांच्यातील औदासिन्य व निष्क्रियता यामुळे येथील लोकशाही ही नेतेशाही, पक्षशाही झालेली दिसते.

**पक्षीय राजकारणाला अवाजवी महत्त्व**

तसेच लोककल्याणकारी राज्याची संकल्पना आपल्या घटनेने मान्य केली असली तरी प्रत्यक्षात तसे घडत नाही. निवडून आलेला पक्ष किंवा सरकार आपल्या ठराविक दृष्टिकोणातून निर्णय घेऊन कारभार चालवतो. त्यातून पक्षांतील फाटाफूट, त्यांचे व्यक्तिगत हेवे-दावे, मोठ्या पक्षातून छोटे पक्ष निर्माण होणे (उदा. काँग्रेसमधून बाहेर पडलेल्या गटाने स्थापन केलेला राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, हे अगदी अलीकडील उदाहरण झाले.) असे अनेकदा घडले आहे. राष्ट्रीय पातळीवरील बहुतेक सर्वच पक्षांमध्ये एकदा तरी अशी फूट पडलेली आढळते. केवळ वैयक्तिक स्वार्थासाठी व सत्तेसाठी स्थापन करण्यात आलेले असे छोटे-मोठे पक्ष राष्ट्रीय पातळीवर मान्यता मिळवून सरकार स्थापन करण्याएवढे व देशहितासाठी निर्णय घेण्याएवढे सक्षम नसतात असेच आढळते. त्यामुळे ते कुठल्यातरी मोठ्या पक्षाशी युती करतात. त्यांचे अस्तित्व राजकीय समीकरणांसाठीच असते.

याशिवाय राजकारणातील गुन्हेगारी सर्वश्रुत आहेच. त्यातच चित्रपटअभिनेते, अभिनेत्री व गुंड लोकांना आपल्या पक्षातून निवडून आणण्याची राजकीय पक्षांची अहमहमिकाच लागते. अपवाद असले तरी सत्तेच्या, स्वार्थाच्या, पैशाच्या राजकारणात 'जनहित', 'राष्ट्रहित' हे शब्द कुठल्या कुठे विरून जातात. या अशा राजकारणात काही सच्चे, अपक्ष उमेदवार असले तरी त्यांना एकट्या-दुकट्याला काही करणे शक्य नसते, त्यामुळे ते एकतर जिंकून येत नाहीत किंवा निवडून आले तरी भरीव कार्य करू शकत नाहीत.

दुसरे महत्त्वाचे म्हणजे राजकीय पक्ष आपल्या स्वार्थासाठी जातीचे, धर्माचे राजकारण करतात. अठरापगड जातीच्या, विविध भाषिक व धार्मिक नागरिकांना न दुखावता सामाजिक व राजकीय हिताचे निर्णय घेणे फारच अवघड आहे. भाषावर प्रांतरचनेमुळे काही फायदे झाले असले तरी त्यामुळे प्रत्येक भाषिक गटाचे वर्चस्व वाढले. यातूनच प्रादेशिक पक्षांना जास्त महत्त्व मिळू लागले. प्रादेशिकतेला जपण्यासाठी राज्याराज्यांमध्ये नवे वादविवाद निर्माण होऊन

केंद्रसरकारसाठी ती एक डोकेदुखीच ठरली. राजकारणातील अशा गोंधळात अज्ञानी, निरक्षर, रोगराई व बेकारीने ग्रस्त असलेल्या नागरिकांकडे बघायला वेळ तरी कोणत्या पक्षाला मिळणार ? भ्रष्टाचार, अकार्यक्षमता हा तर येथे एवढा मोठा प्रश्न आहे की कोणत्याही सरकारने जी काही समाजोपयोगी धोरणे अवलंबिली त्याचे फायदे इतरांनी करून घेतले. त्याची फळे ज्यांच्यापर्यंत पोचायला हवीत त्यांच्यापर्यंत ती कधीच पोचली नाहीत. त्यामुळे अनेक क्षेत्रांत देशाची उल्लेखनीय प्रगती झाली असली तरी निरक्षर व उपेक्षित समाज जिथे होता, तिथेच राहिला.

हे सर्व विवेचन झाले राजकीय बाजूचे. आता लोकशाही सुयोग्य रीतीने राबविण्यासाठी लोकांना जे मिळायला हवे किंवा त्यांनी जे मिळवायला हवे त्याबाबत थोडक्यात विचार करू.

**'लोक-कृती' तरी कुठे ?**

सुदृढ लोकशाहीसाठी नागरिकांपर्यंत सर्व प्रकारची खरी माहिती पोचणे, त्यांनी त्याचे विश्लेषण करून, अभ्यास करून त्यावर निर्णय घेणे, आपल्या निर्णयाला अनुसरून कृती करणे, आपण निवडून दिलेल्या प्रतिनिधीमार्फत आपले मत व निर्णय संबंधित अधिकार यंत्रणेपर्यंत पोचविणे व त्याची अंमलबजावणी करवून घेणे असे सर्व असणे अपेक्षित आहे. पण आज या सामान्य नागरिकाची राजकीय निर्णयप्रक्रियेत अशी भूमिका आहे काय ? या प्रश्नाचे उत्तर आपल्याला नकारार्थी मिळते. कारण, लोकशाहीसाठी नागरिक हे सुशिक्षित, सुजाण, जागरूक असायला हवेत. त्यांच्या मतांना निर्णायक महत्त्व मिळायला हवे. आज भारतात असे घडले नाही म्हणून येथील लोकशाहीसमोर प्रश्नचिन्हे लावण्याची वेळ आली आहे.

लोकशाहीसाठी असा सुजाण नागरिक तयार करणे हे काम केंद्र व प्रत्येक राज्य सरकारने, प्रत्येक राजकीय पक्षाने सर्वोच्च प्राधान्याने करायला हवे होते. पण असा सुजाण नागरिक तयार झाला की आपल्याला सत्तेचे, स्वार्थाचे राजकारण करता येणार नाही हे जाणून त्यांनी याकडे सतत दुर्लक्षच केले. यामुळेच शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचे उद्दिष्ट अद्याप पूर्ण करण्यात आलेले नाही. याला जसे राजकीय कारण आहे तसेच आर्थिक, सामाजिक कारणही आहे. रोजी-रोटीच्या प्रश्नात अडकलेल्या बहुसंख्य समाजाचे शिक्षणाकडे लक्ष जाऊच शकले नाही. दुसरीकडे, सुशिक्षित बेरोजगारांची संख्या वाढत राहिल्याने शिकून काय होणार आहे ? अशी नकारार्थी भूमिकाच तयार झाली. तिसरे म्हणजे,

शिक्षणपद्धतीतील काही मूलभूत दोषांमुळे शिक्षणाची गोडीही निर्माण होऊ शकली नाही. अशा रीतीने भारतात लोकशाहीसाठी आवश्यक असलेला शिक्षित समाज तयारच झाला नाही.

जो एक मध्यमवर्गीय समाज शिकला तोही आपल्याच स्वार्थात अडकला. 'मी व माझे' या विश्वाच्या पलीकडे तो गेला नाही. राजकारणाविषयी औदासिन्य, सामाजिक प्रश्नांबद्दल अनास्था, एकीकडे अतिसहनशील व दुसरीकडे स्वार्थी वृत्ती यामुळे हा समाज शिकूनही आपल्या हक्कांबद्दल आणि कर्तव्याबद्दल जागरूक झाला नाही.

भारतीय समाजाचे मानसच 'राजा बोले दळ हाले' अशा प्रकारचे असावे, असेही मत चर्चेच्या ओघात व्यक्त करण्यात आले. फार पूर्वीपासून येथे राजेशाही, घराणेशाही होती. त्यानंतर येथे ब्रिटिशांचा अंमल होता. त्यामुळे स्वातंत्र्यापूर्वीचा समाज केवळ स्वातंत्र्य मिळवायचे या ध्येयाने भारावलेला होता. समाज सुधारण्याचा प्रयत्न तेव्हाही होत होता, पण स्वातंत्र्य मिळविण्याच्या प्रयत्नांपुढे तो अपुराच होता. रूढी, परंपरा, अज्ञान, जात-धर्म यात अडकलेल्या समाजाला बाहेर काढण्याआधीच भारताला स्वातंत्र्य मिळाले. येथील तत्कालीन राजकीय नेते लोकशाहीच्या संकल्पनेने भारावलेले होते. त्यामुळे समाजाचा, परिस्थितीचा सर्वांगीण विचार करून त्यांनी लोकशाही स्वीकारली तरी अनेक अडचणींमुळे लोकशाहीसाठी आवश्यक असलेला सुजाण नागरिक त्यांना तयार करता आलाच नाही.

औद्योगिक व आर्थिक प्रगतीच्या वेगापुढे समाजाच्या साक्षरतेचा वेग मागे पडला. औद्योगिक व आर्थिक प्रगतीत एक गट पुढे गेला. त्यामुळे उच्चवर्ग, मध्यमवर्ग व कनिष्ठवर्ग असे गट आपोआपच तयार झाले. पूर्वीच्या समाजाच्या मानसिकतेला ते जोडणारे होते त्यामुळे ते मोडण्याचा प्रयत्नही झाला नाही.

अशा प्रकारे भारतात गरिबी, निरक्षरता, अनारोग्य, वाढती लोकसंख्या, बेकारी व इतर असंख्य प्रश्न निर्माण होत गेले. एकीकडे उच्चतंत्रज्ञान, उच्चशिक्षण, अतिशय श्रीमंती असे सर्व वाढत असतानाच दुसरीकडे टोकाची गरिबी व टोकाची निरक्षरताही वाढत गेली. आपल्या लोकशाहीचे विदारक चित्र हे असे आहे. आज घटनेने कागदोपत्री येथील नागरिकांना कितीही अधिकार दिले असले तरी त्याचा उपयोग फारसा झाला नाही.

**(पान नं. २९ वर)**

## अमेरिका

# 'तारेवरची कसरत' सर्वत्र सारखीच !

'अर्थार्जनासाठी आणि करियरसाठी घराबाहेर पडणाऱ्या स्त्रीला 'तारेवरची कसरत' करावी लागते' हे वाक्य सतत ऐकण्याचा, वाचण्याचा कंटाळा आला तरी, ही वस्तुस्थिती जगात सर्वत्र थोड्याफार फरकाने सारखीच असते, हे अमेरिकेतील नुकत्याच झालेल्या एका घटनेवरुन स्पष्ट होईल.

मॅसॅच्युसेट्स भागातील तरूण लेफ्टनंट गव्हर्नर श्रीमती जेन स्वीफ्ट यांना आपली राजकीय कारकीर्द सांभाळताना चांगलीच कसरत करावी लागत आहे. दोन वर्षांपूर्वी गव्हर्नरपदाच्या निवडणुकीच्या वेळी प्रचारसभेत त्यांनी आपण लवकरच आई होणार असल्याचे जाहीर केले होते. निवडणुकीच्या काही दिवस आधीच त्यांनी एका कन्येला जन्म दिला. लेफ्टनंट गव्हर्नरपदी जिंकून आल्यानंतर अमेरिकेतील करियर करणाऱ्या स्त्रियांच्या त्या 'आदर्श' ठरल्या. काही महिन्यांपूर्वी 'जेन एअर' नावाच्या प्रकरणात त्या अडकल्या तेव्हा मात्र आदर्शाच्या मागे उभे राहायचे की नाही असा प्रश्न तेथील स्त्रियांना पडला.

'जेन एअर' प्रकरण असे की आपली लहानशी मुलगी एलिझाबेथ आजारी असल्याचे समजल्यानंतर लवकर घरी पोहचण्यासाठी श्रीमती जेन स्वीफ्ट यांनी प्रशासनाचे हेलिकॉप्टर वापरले. एलिझाबेथची काळजी घेण्यासाठी त्यांनी आपल्या कार्यालयीन वेळेत कार्यालयातील सहकाऱ्यांची मदत घेतली. शिवाय राहते घर सोडून नव्या घरात जाताना, सामान हलवितानादेखील त्यांनी कार्यालयातील विविध सेवांचा वापर केला असे आरोप त्यांच्यावर करण्यात आले. यावर श्रीमती स्वीफ्ट यांनी प्रथम क्षमा मागण्याचे नाकारले.

या प्रकरणी काही नागरिकांचा त्यांना पाठिंबा मिळाला. पुरूष अधिकारी अशा कार्यालयीन सेवांचा लाभ नेहमीच घेत आले आहेत. एखाद्या स्त्रीने मुलीसाठी असे केले तर काही बिघडले नाही असे म्हणून या नागरिकांनी त्यांना सहकार्य केले. पण नाही तरी लेफ्टनंट गव्हर्नरांना काही काम नसतेच त्यामुळे त्यांनी घरचे

काम केले अशी टीकाही त्यांना सहन करावी लागली. अखेरीस प्रकरण फार वाढू नये म्हणून त्यांनी क्षमायाचना केली.

तथापि श्रीमती स्वीफ्ट यांच्यावरील प्रसंगानंतर स्त्रीचे मातृत्व व तिची राजकीय कारकीर्द यांची सांगड घालणे खरंच अवघड आहे का ? यावर मॅसॅच्युसेट्समधील पुरोगामी तात्त्विक खल करीत आहेत. समानता हवी असेल तरी पुरूषांवर टीका होते तशा स्त्रियांवर होणारच. पुरुष जसे 'घर' बाजूला ठेवून काम करतात तसेच स्त्रियांना मुलाबाळांचा व घराचा विचार न करता करियर करण्याची तयारी ठेवली पाहिजे. मुलांच्या नावाखाली त्यांनी कार्यालयीन खर्च वाढवायचे काही कारण नाही, असेही मत व्यक्त करण्यात येत आहे. तेव्हा कोणतेही शतक जावो अथवा येवो, वैचारिक व मानसिकदृष्ट्या स्त्रियांना जगात कुठेही अशा प्रश्नांना सामोरे जावेच लागणार आहे हेच यावरून सिद्ध होते.

(द इकॉनॉमिस्ट २९ जानेवारी ते ४ फेब्रुवारी २०००)

■■

---

**(पान नं. २७ वरून)**

**अद्याप आशेला जागा ?**

आजघडीला येथील लोकशाहीवर प्रश्नचिन्ह लावण्यात आले असले तरी ही परिस्थिती नक्कीच बदलू शकते. अशा निराशामय वातावरणातही सर्वोच्च न्यायालयाचे अलीकडचे काही निकाल दिलासा देणारे ठरले आहेत. लोकशाहीचा चौथा स्तंभ असणाऱ्या वृत्तपत्रांचे सामर्थ्य बऱ्यापैकी अबाधित आहे. येथील निवडणूक प्रक्रिया अद्याप जिवंत आहे. ग्रामीण भागांतील लोकसहभाग अतिशय संथ गतीने का होईना वाढतो आहे, अनेक स्वयंसेवी संस्थांकडून जागरूक नागरिक पुढे येत आहेत. समाजाला जागे करण्याचे कार्य ते करीत आहेत. त्यामुळे अजूनही आशेला वाव आहे. मात्र जागरुक नागरिक घडण्याचे हे कार्य खूप वेगाने व्हायला हवे आहे. समाजात एका अर्थाने अशी मानसिक क्रांतीच घडून यायला हवी आहे. जे सुजाण, सुशिक्षित, जागरूक नागरिक आहेत त्यांनीच धीराने, शांतपणे, धैर्याने, नेटाने ही मानसिक क्रांती घडवून आणण्यासाठी प्रयत्न करायचा आहे.

■■

जागतिक

# जागतिकीकरण आणि स्थानिकता

**आ**जच्या संगणकयुगात, व्यापारयुगात जागतिकीकरण ही अतिशय महत्त्वाची संकल्पना ठरलेली आहे. याप्रक्रियेत जगातील राष्ट्रे वेगाने जवळ येत असून स्थळ-काळाच्या मर्यादा मागे पडत आहेत. एकीकडे 'राष्ट्रा'चे महत्त्व कमी होताना दिसते तर दुसरीकडे काही 'राष्ट्रे' बळकट होताना आढळतात. तसेच जागतिकीकरणामुळे स्थानिकतेचा संदर्भ हरवतो आहे असे वाटते. या पार्श्वभूमीवर 'जागतिकीकरण' आणि 'स्थानिकता' यांचा जरा वेगळ्या दृष्टिकोणातून विचार केला पाहिजे, असे मत अरिफ डिर्लिक या लेखकाने 'डेव्हलपमेंट' या नियतकालिकात व्यक्त केले आहे. 'ग्लोबल' (जागतिक) आणि 'लोकल' (स्थानिक) या दोन्हींचे एकत्रीकरण बरेचदा आढळते, त्यामुळे 'ग्लोकल' (जागनिक) अशी संकल्पना रुढ व्हावी असे त्यांना वाटते. 'ग्लोबॅलिझम अँड द पॉलिटिक्स ऑफ प्लेस' या त्यांच्या लेखावर आधारित असे काही विचार येथे मांडले आहेत.

जागतिकीकरण होणे आता अटळ आहे आणि त्याचे अस्तित्व कायमस्वरूपी असेल असे आपल्यापैकी अनेकांना वाटते. जग आता बदलले आहे आणि सतत बदलतही आहे. बदलाची ही दिशा, बदलता येणार नाही उलट ती आपल्यालाच जागतिकीकरणाकडे खेचते आहे, त्यातून स्थानिकता लोप पावणार आहे, अशी अनेकांची धारणा झाली आहे. अनेक प्रकारे हे असे घडत असले तरी आपली विचारांची मूळ दिशाच चुकत आहे. जागतिकीकरणाकडे बघण्याचा आपला दृष्टिकोणच बदलायला हवा आहे. पण तत्पूर्वी आपला नेमका दृष्टिकोण आहे तरी कसा व तो कसा अपुरा आहे हे समजून घेतले पाहिजे.

आपली विचार करण्याची पद्धतच आता जागतिकीकरणकेंद्री (Globalocentric) आणि जागतिकीकरणाधारित (Globalitarian) अशी झाली आहे. आपण असे गृहीत धरून चालतो की, जे जे काही जागतिक आहे ते स्थानिकतेवर वर्चस्व गाजविणार आहे आणि सत्ताकेंद्रही तेच राहणार आहे. म्हणजेच आपली विचार करण्याची पद्धत जागतिकीकरणकेंद्री आहे. स्थानिकतेत बदल घडवून आणण्यासाठी विविध क्षेत्रातील जागतिक प्रक्रिया कारणीभूत ठरतात,

असेही गृहीत धरले जाते म्हणून आपली विचारपद्धती जागतिकीकरणाधारित (globalitarian) आहे.

साधारणपणे, भांडवल, तंत्रज्ञान, नवनवीन बदल घडवून आणण्याच्या क्षमता असलेल्या बाबी अशा काही घटकांचा समावेश 'जागतिक' या शब्दात करण्यात येतो तर स्थळ-ठिकाणे, शहरे, गावे, श्रम, या बाबींचा समावेश 'स्थानिक' या शब्दांतर्गत करण्यात येतो. ही विभागणी मुळातच अयोग्य आहे, असे लेखकाला वाटते.

स्थानिकतेचे महत्त्व आहेच पण ते जागतिकीकरणात लपून जायला नको या दृष्टिकोणातून लेखात म्हटले आहे की, "स्थानिकतेने जागतिकीकरणासमोर दबून न जाता जागतिकीकरणाच्या प्रक्रियेवर आपला ठसा उमटविण्याचा किंवा त्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे. जागतिकीकरणातून अपरिहार्यपणे तयार होणाऱ्या नव्या जगाला आकार देण्याचे कार्य स्थानिकतेला पार पाडायचे आहे. स्थानिक जनतेचे विचार व कृती यांचा संगम झाला तरच हे घडू शकणार आहे. खरे तर 'स्थानिकता' हेच या नवीन बदलाचे महत्त्वपूर्ण साधन ठरू शकेल."

**संकल्पनेत गोंधळ**

पण स्थानिक आणि जागतिक या शब्दांमागे एक वैचारिक गोंधळ आहे असे म्हणून त्याबाबत थोडेसे विश्लेषण लेखात करण्यात आले आहे. गेल्या दशकात स्थानिकतेचा संदर्भ मागे पडला असला तरी मानवी व्यवहारात स्थानिकतेमधून निर्माण होणाऱ्या भावनांना आणि गरजांना महत्त्व मिळत आहे. विविध गावे, शहरे, तेथील जनजीवन, रुढी-परंपरा, आचार-विचार, गरजा हे सर्व परस्परांमध्ये गुंफलेले आहे, त्यामुळेच त्या त्या गावांना महत्त्व मिळाले आहे. ते ठराविक वैशिष्ट्य ही त्या परिसराची ओळख असते, खूण असते. एका अर्थाने त्या स्थळाचे ते व्यक्तिमत्त्व असते. आजच्या बाजाराभिमुख अर्थव्यवस्थेतही बहुराष्ट्रीय कंपन्यांना देखील स्थानिकेतचा विचार करूनच विविध उत्पादने तयार करावी लागतात आणि जाहिरात व विक्रीच्या धोरणातही त्याचा समावेश करावा लागतो असे हावर्ड विद्यापीठातील एका अभ्यासावरून नुकतेच आढळले आहे.

जागतिकीकरणात, प्रामुख्याने आर्थिक, औद्योगिक, सामाजिक व सांस्कृतिक घडामोडींचा समावेश करण्यात येत असला तरी, जगातील फार मोठा भाग असलेली अनेक राष्ट्रे प्रत्यक्षात या प्रक्रियेबाहेरच असतात. आणि जिथे जिथे जागतिकीकरण थेट पोहचलेले असते तिथे सुद्धा बहुतांश बाबी त्या प्रक्रियेपासून खरे तर दूरच असतात. म्हणजे व्यवहारात अनेक घटकांचा जागतिकीकरणाशी प्रत्यक्ष संबंध आलेला नसतो. म्हणजेच जागतिक हे एका बाजूने राष्ट्रीय व

प्रादेशिक यापेक्षा काहीतरी जास्त असते पण ते संपूर्ण जगाचे प्रतिनिधित्व मात्र नक्कीच करीत नसते.

जे जागतिक असते ते थोडे असले तरी भौगोलिक व राजकीय सीमा त्याला बांधून ठेवू शकत नाहीत. जागतिकमध्ये कधीकधी स्थानिक गोष्टींचा अंतर्भाव असतो, तर जी बाब मूलतः स्थानिक असते, तीच कधीकधी जागतिकही ठरू शकते. जे जागतिक असते त्याला स्थळ, काळ, वेळाच्या मर्यादा नसतात आणि जे स्थानिक असते ते जागतिकच्या विरुद्धच असते असे सर्वसाधारणपणे समजले जाते. पण व्यवहारात हे असे घडत नाही.

जागतिक आणि स्थानिक यांना आपण परस्परांपासून जेवढे वेगळे करायचा प्रयत्न करू तेवढा यातील गोंधळ वाढत जाईल, जागतिक घटकांमुळे स्थानिक नामशेष होणार नाही, कारण स्थानिक आहे म्हणूनच तर जागतिकतेला अर्थ प्राप्त होतो, तसेच काहीतरी जागतिक असते म्हणूनच स्थानिकतेला अर्थ प्राप्त होतो.

एखादा घटक स्थानिक आहे की जागतिक हे ठरविणेही अवघड होत आहे. उदाहरणार्थ - रेल्वे किंवा विमानसेवा. रेल्वेमार्गावरील रूळ, डबे, कर्मचारी व इतर सर्व संबंधित घटक हे स्थानिक असतात. पण हा मार्ग जसा एकाच देशातील अनेक गावांना जोडतो तसाच तो अनेक राष्ट्रांना जोडणाराही असू शकतो. पण त्याचवेळी तो जागतिक नसतो ही वस्तुस्थिती आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत मदत करणारी कोणतीही बाब जागतिकच असते, असे नाही. असाच घोटाळा अनेक बाबतीत होतो म्हणूनच एखादी गोष्ट स्थानिक किंवा जागतिक असा शिक्का मारणे योग्य नाही. अपवाद वगळता काही गोष्टी या स्थानिक असतातच पण त्याचवेळी त्या जागतिकही असतात. म्हणूनच त्यांना जागतिक + स्थानिक मिळून जागनिक (glocal) असे संबोधावयास हरकत नसावी.

**विकासवादाचे जागतिकीकरण**

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत जागतिकीकरणाला, विकासाला उपयुक्त ठरतील अशी काही ठिकाणे तयार करण्यात येतात. म्हणजेच भौगोलिकदृष्ट्या जी गावे, शहरे अस्तित्वात असतात, त्यांमध्ये जागतिकीकरणानुकुल विकासाभिमुख संस्कृती, भांडवलशाही, सामाजिकता, मानसिकता रुजविण्यात येते. हे कधीकधी सहजपणे घडत असते तर कधी कधी प्रयत्नपूर्वक घडविले जाते. हे रोखणे वा यातून पळवाट काढणे अशक्यप्राय होऊन बसते, कारण जीवन जगण्याची ती एक अटच वा रीतच होते. तसेच या प्रक्रियेतून निर्माण होणाऱ्या प्रश्नांमधून असमाधान वाढते. असमाधान वाढल्याने वर्चस्वाशी संबंधित असे अनेक प्रश्न वाढून, त्यांचे काही ना काही बरेवाईट परिणाम समाजावर होत राहतात.

यातीलच एक महत्त्वाची बाब अशी की गरिबी, विकास, प्रगती, चांगले जीवन जगणे या सर्व संकल्पनांचा विचार एकांगी दृष्टिकोणातून करण्यात आला आहे किंवा कसे याचा शोध घेण्यात आला पाहिजे. काही प्रगत राष्ट्रांनी ठरविलेल्या व्याख्यांना इतर सर्व राष्ट्रांनी संमती दिली असे घडले आहे का? याचा विचार व्हायला हवा. आज युरोप व अमेरिकाप्रणित विकास, भांडवलशाही, साम्राज्यवाद विकासवाद सर्वत्र रुजताना दिसत असून त्यामुळे निसर्गाचे व समाजाचे संतुलन बिघडत असल्याचे आढळते. अशाच विकासवादाचे जागतिकीकरण होणे हे धोकादायक ठरू शकते, किंबहुना ते धोकादायक झालेही आहे.

**स्थानिकतेला महत्त्व**

जागतिकीकरणाच्या व विकासाच्या वरील प्रक्रियेत अनेक गुंतागुंतीचे प्रश्न निर्माण होतात. स्थानिकतेशी संबंधित असलेले हे प्रश्न नव्याने निर्माण झालेल्या संघर्षाचे मूळ कारण असते. उदाहरणादाखल भारतातीलच नर्मदा नदीवर सरदार सरोवर प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्यांचा संघर्ष, एनरॉनमुळे निर्माण झालेले प्रश्न किंवा अर्थव्यवस्थांच्या उदारीकरणाच्या प्रक्रियेतील, 'स्वदेशी विरूद्ध विदेशी'चा वाद यांचा विचार करता येईल. स्थानिकतेवर आक्रमण झाले किंवा असमानता निर्माण झाली की सामाजिक तणाव वाढतो. कधीकधी आपल्या समाजाच्या अस्तित्वासाठी, स्थानिकता जपण्यासाठी लिंगभेद, जातीभेद, वंशभेद विसरुन नागरिक एकत्र येताना आढळतात तर कधी यामुळे हे भेद आणखी तीव्र होऊन त्यांच्यात फूट पडते. वादात ज्याचे पारडे जड त्याची सरशी होते. जागतिकीकरणामुळे स्थानिकतेवर असे आघात होत जातात. कधी स्थानिकतेचा विजय तर कधी जागतिकीकरणाचा विजय, असे होत होत ही प्रक्रिया पुढे जात असते.

यातून संस्कृतीवादही जोपासला जात असतो. कोणतीही संस्कृती ही त्या त्या ठिकाणचे प्रतिनिधित्व करीत असते. स्थानिकतेपासून संस्कृतीला वेगळे करता येत नाही. आपल्या संस्कृतीचे नुकसान करणे हे स्थानिकतेचे समर्थन करणाऱ्यांना पटत नाही आणि एक संस्कृती नष्ट करुन 'जागतिक संस्कृती' लादणे हे जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत एकदम शक्य होत नाही. त्यामुळेच स्थानिक संस्कृतीत हळूहळू शिरकाव करीत जागतिकीकरण होत असते. म्हणजेच स्थानिकतेशी जमवून घेण्याचा प्रयत्न करूनच जागतिकीकरण पुढे जात असते. भारतात सध्या असेच घडत आहे, हे आपण बघतो आहोतच. सध्याच्या विकास प्रक्रियेत तिसऱ्या जगातील राष्ट्रांना जे काही थोडेफार महत्त्व दिले जात आहे, ते याच उद्दिष्टातून, असे म्हटले जाते.

जागतिकीकरणात स्थानिकतेला महत्त्व मिळण्याचे आणखी एक कारण म्हणजे अनेक 'राष्ट्रे-राज्ये' (Nation-State) जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत सहभागी

होऊन जागतिक व स्थानिक यामधील दुवा म्हणून काम करीत आहेत. त्यामुळे स्थानिकतेलाच आपले हिंतरक्षण करायचे आहे. याचा अर्थ 'राष्ट्रे-राज्ये' स्थानिकतेच्या विरोधात आहेत असे नव्हे किंवा ते जागतिकीकरणाच्या बाजूचेच आहेत असेही नव्हे, पण 'राष्ट्रे-राज्ये' एका स्थित्यंतराच्या कालखंडातून जात आहेत हे समजून घेतले पाहिजे. स्थानिकतेला स्वतःच पुढे येऊन जागतिकीकरणासमोर ठामपणे उभे राहिले पाहिजे ते याच दृष्टीने.

## नवी मिश्र व्यवस्था हवी ?

वरील विवेचनानंतर असा प्रश्न निर्माण होतो की स्थानिक आणि जागतिक असे दोन्ही मिळून एक मिश्र व्यवस्था उभी राहणे शक्य आहे का? अर्थात अशी मिश्र व्यवस्था हेच सर्व प्रश्नांवर एकमेव उत्तर असेलच असे नाही. अशा मिश्र व्यवस्थेत ज्याला आपण जागनिक (Glocal) असे म्हणतोय, त्यात कधी जागतिकतेचे वर्चस्व राहील तर कधी स्थानिकतेचे. पण त्यात निर्णायक बिंदू मात्र निसर्ग, पर्यावरण, परिसरसंतुलन यांचा विचार करणारा असावा असे ठरविता येईल.

जागतिकीकरणामुळे अनेक राष्ट्रांमध्ये काही प्रश्न निर्माण होत असले तरी त्यातून काही फायदेही मिळत आहेत. या सर्वच गोष्टींना विरोध करणारे (संस्था, संघटना इ.) एकत्र येत आहेत तर दुसरीकडे त्यांचे समर्थन करणारे जगातील विविध घटक यांच्यातील परस्पर सहकार्य वाढत आहे. त्यामुळे त्यांच्यात नवीन ध्रुवीकरण होत आहे. जागतिक प्रक्रियांचा सर्व अंगानी विचार करू शकणाऱ्या विचारवंतांची गरज आज जाणवते आहे.

स्थानिकतेचे समर्थक व जागतिकीकरणाचे समर्थक यांनी एकत्र येऊन वादग्रस्त प्रश्नांवर उत्तर शोधायचे आहे. स्थानिक की जागतिक या वादात वैचारिकदृष्ट्या न अडकता लोकशाहीची मूल्ये, माणुसकीची मूल्ये, निसर्ग न ओरबाडणारी मूल्ये, वैज्ञानिक मूल्ये अशा सर्वांना एकत्र आणणारी नवी जागतिक मूल्यव्यवस्था उभी राहणे हेच सर्वांच्या फायद्याचे ठरेल.

स्थानिकतेची सर्व वैशिष्ट्ये, सर्व बाजू विचारात घेऊन स्थानिकता नष्ट होणार नाही पण जग जवळ येण्याची प्रक्रियाही चालू असेल असे होऊ शकेल का, यावर समाजातील सर्व बुद्धिवंतांनी एकत्रित येऊन विचार करायचा आहे. आर्थिक व राजकीय धोरण आखणारे, बुद्धिवादी सामाजिक विचारवंत, शिक्षणतज्ज्ञ, स्वयंसेवी संस्था, या सर्वांसमोर एकविसाव्या शतकात हे आव्हान उभे ठाकणार आहे.

■■

# अर्थबोधपत्रिका

अर्थबोधपत्रिकेचे सभासद होण्यासाठी करावयाचा अर्ज

दिनांक :

संपादक, 'अर्थबोधपत्रिका',
भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,
'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११ ०१६.

सस्नेह नमस्कार,

मला/आमच्या संस्थेला अर्थबोधपत्रिकेचे सभासद म्हणून अंक क्रमांक ________ पासून नोंदवून घ्यावे. पुढील सहा अंकांचे देणगीमूल्य रूपये ५०/- (रु. पन्नास फक्त) डिमांड ड्राफ्टने / मनीऑर्डरने / पोस्टल ऑर्डरने / रोख पाठविण्यात येत आहे. ड्राफ्टचा तपशील पुढील प्रमाणे :

**(फक्त पुण्याच्या बँकेवरील चेक पाठवावेत.)** ____________________

अंक पाठविण्यासाठी नाव व पत्ता : ____________________

____________________

____________________

____________________

____________________ ☐☐☐☐☐☐

संबंधित संस्थेचे नाव व पत्ता : ____________________

____________________

____________________

____________________

____________________ ☐☐☐☐☐☐

____________________

सही

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीतर्फे विविध विषयांवर चर्चासत्रे आयोजित केली जातात. अशा चर्चासत्रात सहभागी होण्याच्या दृष्टीने आपल्या आवडीचे विषय ____________________

____________________

# सूचना

- चेक / ड्राफ्ट 'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी, पुणे' या नावाने पाठवावेत. **पुण्याच्या बँकेवरीलच चेक मान्य करण्यात येतील.**
- देणगीमूल्य व्यक्ती, संस्था, महाविद्यालये, सार्वजनिक वाचनालये या सर्वांसाठी एकच आहे.
- या नमुना अर्जाच्या झेरॉक्स प्रती किंवा हस्तलिखित प्रतीद्वारे आपण देणगीमूल्य पाठवू शकता.
- आपल्या परिचितांमध्ये अशा प्रती वाटून किंवा आम्हाला त्यांचे पत्ते कळवून आपण, हा अंक अनेक वाचकांपर्यंत पोचविण्यास सहाय्य करू शकता.

## 'अर्थबोधपत्रिका' विनामूल्य मिळविण्याची योजना

अर्थबोधपत्रिकेचे उद्दिष्ट व लेखांचे स्वरूप आपल्याला आवडले असेल तर आपण आम्हाला वाचकवृद्धीसाठी मदत करावी, अशी विनंती करीत आहोत. वाचकवृद्धीच्या या योजनेतून आपल्याला एका वर्षभरातील अंक विनामूल्य मिळू शकतील. त्याचा तपशील खालील प्रमाणे :

- या योजनेत भाग घेऊ इच्छिणाऱ्या व्यक्तीस एकावेळी कमीत कमी पाच नवीन देणगीदार मिळवून द्यावे लागतील.
- अशी जमा केलेली देणगीमूल्याची रक्कम (कमीत कमी रु. २५०/-) एकत्रितपणे देणगीदारांच्या सभासदत्वाच्या अर्जासहित रोख, डिमांड ड्राफ्ट किंवा मनिऑर्डरने आमच्याकडे पाठवावी लागेल. (या योजनेखाली चेकने रक्कम स्वीकारली जाणार नाही)
- अशा रीतीने देणगीमूल्य देणारे कमीत कमी पाच नवीन सभासद मिळवून देणाऱ्यांना 'अर्थबोधपत्रिके'चे पुढील सहा अंक वर्षभर विनामूल्य पाठविले जातील.
- ही योजना अल्पकाळापुरतीच मर्यादित असून पुरेशी सभासद नोंदणी झाल्यावर कोणतीही पूर्वसूचना न देता ती बंद करण्यात येईल.

# भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना :**

- इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे :**

- भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे;
- अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयाचे ज्ञान व माहिती देणे;
- इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य / पत्रके / पुस्तिका योग्य नमुन्यांत तयार करुन प्रकाशित करणे.

**उपक्रम :**

- संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक (जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी) चालवले जाते.
- संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात.
- अलीकडे, संस्थेतर्फे सर्व सामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणाऱ्या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.
- नोव्हेंबर १९९८ पासून अर्थबोधपत्रिका प्रकाशित केली जात आहे.

## - संस्थेचे मंडळ -

स. वा. कोगेकर • मृणालदत्त चौधरी • कुमुदिनी दांडेकर
आनंद नाडकर्णी • मनोहर भिडे • नीळकंठ रथ • के. एन्. राज
व्ही. एम्. राव • दि. चं. वधवा • सु. म. विद्वांस
ए. वैद्यनाथन • सत्यरंजन साठे • रामदास होनावर

**प्रेषक :**

**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी**

'अर्थबोध',

९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग,

पुणे - ४११ ०१६.

फोन : ५६५७१३२ / ५६५७२१०

ई-मेल : ispe@vsnl.com